# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक ०९ जुलै, २०१८ / आषाढ १८, १९४० ( शके )**

**(१) वित्त व नियोजन, वने मंत्री**
**(२) ग्रामविकास, महिला व बालविकास मंत्री**
**(३) वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री**
**(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**
**(५) जलसंधारण, राजशिष्टाचार, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री**
**(६) रोजगार हमी, पर्यटन मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७३**

---

### सांगली जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालयात सलाईनचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत

**(१) * १२०७८५ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील १३ ग्रामीण रुग्णालयात सलाईनचा तुटवडा निर्माण झाला असल्याने गरजू रुग्णांना बाहेरुन सलाईन विकत आणावे लागत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सलाईनचा तुटवडा निर्माण होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या ग्रामीण रुग्णालयांना आवश्यक सलाईन व औषधांचा पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

सांगली जिल्हयातील १३ ग्रामीण रुग्णालयांपैकी ९ ग्रामीण रुगणालयांमध्ये मे महिन्यांमध्ये सर्व प्रकारच्या सलाईनचा साठा उपलब्ध होता. उर्वरीत ४ ग्रामीण रुग्णालयांमध्ये काही प्रकारच्या सलाईनचा साठा नव्हता. यापैकी ग्रामीण रुग्णालय, चिंचणी वांगी यांनी रुग्णांना सलाईन बाहेरुन विकत आणण्यास सांगितले हे खरे आहे.

(२) माहे मे २०१८ मध्ये डेक्सट्रोज सलाईचा पुरवठा झाला. परंतू, खरेदी धोरणानुसार औषधे वापरात आणण्यापूर्वी गुणवत्ता तपासणी करणे आवश्यक असल्यामुळे हा पुरवठा वापरात आणता आला नाही. तसेच औषध खरेदी प्रक्रियेत बदल झाल्यामुळे सुरुवातीच्या काळात खरेदीसाठी कालावधी लागला.

(३) हाफकिन बायो फार्यास्युटीकल कॉर्पोरेशन लि. मार्फत जिल्हा शल्यचिकित्सक, सांगली यांना रिंगर्स लॅक्टेटचा १०,८०० बॉटल्स पुरवठा दिनांक ०२.०६.२०१८ रोजी आणि डेक्सट्रोस ५ टक्के ११,२०८ बॉटल्सचा पुरवठा दिनाक १५.०५.२०१८ रोजी करण्यात आला आहे. या दोन्हीही औषधांची प्रयोगशाळा चाचणी सुरु असून औषधंचा वापर जूलै अखेरीस अपेक्षित आहे. त्यासोबत स्थानिक स्तरावर औषधे खरेदी करण्यास दिनांक १३.०६.२०१८ च्या पत्रान्वये जिल्हा शिल्यचिकित्सक, सांगली यांना रुपये ४७ लाख निधी वितरीत करण्याता आला आहे. त्यातून रिंगर्स लॅक्टेट १५,००० बॉटल्स, डेक्सट्रोज नॉर्मल सलाईन १५,२३० बॉटल्स आणि नॉर्मल सलाईन २,६०० बॉटल्स खरेदी प्रक्रिया अंतीम टप्प्यात असून पुरवठा जुलै अखेरीस अपेक्षित आहे. सांगली जिल्हयात राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत प्रत्येक रुग्णालयास रुग्ण कल्याण समिती निधी देण्यात आला असून या निधीतून रुग्णांच्या आवश्यकतेनुसार औषधे खरेदी करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचा लाभ सर्वसामान्य नागरिकांऐवजी विमा कंपन्यांना झाल्याबाबत

**(२) * ११६६८३ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.संजय कदम (दापोली), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वसामान्य रुग्ण आणि शेतक-यांसाठी सुरु करण्यात आलेल्या राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचा प्रत्यक्ष लाभ आतापर्यंत फक्त अर्धा टक्के नागरिकांना मिळाला असुन या योजनेचा फायदा सर्वसामान्य नागरिकांऐवजी खासगी कंपन्या आणि विमा कंपन्याना झाल्याचा आक्षेप कॅगने घेतला असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे नोव्हेंबर, २०१६ पर्यंत या योजनेच्या ९ कोटी ३५ लाख लाभार्थ्यांच्या विमा हप्त्यापोटी आरोग्य विभागाने ३ हजार ९ कोटी रुपये विमा कंपनीला अदा केले असुन त्या तुलनेत केवळ ११ कोटी ८९ लाख रुपयांचे दावे विमा कंपनीने मंजूर करुन एकूण रकमेच्या प्रमाणात फक्त

अर्धा टक्का नागरिकांनाच याचा लाभ मिळाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेच्या व्यापक प्रसिध्दीचा अभाव, आरोग्य शिबिरे घेण्यातील कमतरता तसेच आरोग्य केंद्रात आरोग्यमित्रांची नियुक्ती न करणे या कारणास्तव सदरहू योजनेचा अपेक्षित हेतू साध्य होऊ शकलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत प्रत्येक पॉलिसी वर्षात अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून प्राप्त होणाऱ्या पिवळी, अंत्योदय अन्न योजना, अन्नपूर्णा योजना व केशरी शिधापत्रिकांच्या संख्येनुसार एकूण कुटुंबांना विमा संरक्षण देण्यात येते. प्रत्येक पॉलिसी वर्षात त्या त्या वर्षातील शिधापत्रिकांच्या आधारे सुनिश्चित लाभार्थींना विमा संरक्षण देण्यात येते. महालेखापाल यांच्या अहवालामध्ये दिनांक २ जुलै, २०१२ ते दिनांक ३१ मार्च, २०१७ या कालावधीतील प्रत्येक पॉलिसी वर्षात विमा संरक्षण देण्यात आलेल्या कुटुंबांची एकूण बेरीज केली असून, ती ९ कोटी, ३४ लाख, ९५ हजार इतकी आहे. (म्हणजे विमा संरक्षित कुटुंबांची संख्या) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना (पूर्वीची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना) ही विमा योजना असून या योजनेंतर्गत दि.२ जुलै, २०१२ ते दि. २६ जून, २०१८ पर्यंत योजनेंतर्गत १८,६२,९४३ एवढया शस्त्रक्रिया / उपचार झालेले आहेत.

सदर योजनेंतर्गत दिनांक २ जुलै, २०१२ पासून माहे नोव्हेंबर, २०१६ पर्यंत लाभार्थ्यांच्या विमा हप्त्यापोटी राज्य आरोग्य हमी सोसायटीने विमा कंपनीस रू.२४५८.०० कोटी (सेवाकर रहित) रुपये अदा केले असून रू. २१९६.३३ कोटी रकमेचे दावे विमा कंपनीने अंगीकृत रूग्णालयात मंजूर केले असून हे प्रमाण विमा कंपनीस प्रदान करण्यात आलेल्या विमा हप्ताच्या रकमेच्या ८९.३४ टक्के आहे.

(३) योजनेची व्यापक प्रसिध्दी, आरोग्य शिबीरांचे आयोजन तसेच आरोग्य केंद्रांमध्ये आरोग्य मित्रांची नियुक्ती ही करारनाम्यातील तरतुदीनुसार विमा कंपनीकडून करण्यात येते. तथापि, राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या संनियंत्रणामुळे योजना जनसामांन्यामध्ये दिवसेंदिवस लोकप्रिय होत असून योजनेंतर्गत लाभ घेणाऱ्या रुग्णांचे प्रमाण वाढत आहे व योजनेच्या लाभापासून पात्र लाभार्थ्यांना वंचित ठेवण्यात येत नाही.

(४) योजनेच्या प्रसिध्दीसाठी अपेक्षित खर्च होणे अपेक्षित असल्याचे महालेखालपालांच्या अहवालात नमूद आहे. महालेखापाल यांच्या अहवालात नमूद केलेल्या बाबींच्या अनुषंगाने प्रभावी उपाययोजना करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वैदयकीय प्रवेशासाठी असलेले प्रादेशिक आरक्षण रद्द करण्याबाबत

**(३) * ११७९७२ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बारावी विज्ञान शाखेचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर वैद्यकीय प्रवेश घेण्याकडे विद्याथ्यांचा कल असून या प्रवेशासाठी संविधानिक आरक्षण असतांना गेल्या काही वर्षापासून ७०/३० या सुत्रानुसार प्रादेशिक आरक्षण असल्याचे दिनांक १० एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात मा.मुख्यमंत्र्याना 'जुक्टा' ने निवेदन दिले असुन वैद्यकीय प्रवेशासाठी शासनाने ७०/३० चे प्रादेशिक आरक्षण रद्द करण्याची मागणी लातूर जिल्हा कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण संघटनेने माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने वैद्यकीय प्रवेशासाठीचे प्रादेशिक आरक्षण रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशामध्ये संविधानिक आरक्षण अस्तित्वात आहे. त्याचप्रमाणे बऱ्याच वर्षांपासून ७०/३० या सूत्रानुसार वैधानिक विकास महामंडळनिहाय प्रादेशिक आरक्षणदेखील देण्यात येते.

(२) ७०/३० सूत्रानुसार प्रादेशिक आरक्षण रद्द करण्यासंदर्भात शासनास विविध निवेदने प्राप्त झाली आहेत. तसेच, सदर आरक्षण रद्द करण्यासाठी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे मराठवाडा पालक शिक्षक संघटनेतर्फे रिट याचिका दाखल करण्यात आली आहे.

(३) सदर प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धूळघाट (ता.धारणी, जि.अमरावती) येथील रोजगार हमी योजनेच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(४) * ११७१५४ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय कदम (दापोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धूळघाट (ता.धारणी, जि.अमरावती) येथील वनपरिक्षेत्रांतर्गत ग्राम पळसकुंडी येथील रोजगार हमी योजनेच्या कामावर काही मजुरांची बनावट नावे व स्वाक्ष-या हजेरी पत्रकावर नोंदवून निधीचा अपहार केल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोहयोअंतर्गत वनपरिक्षेत्र अधिका-याने टी.सी.एम. दुरुस्तीची कामे करतांना मजुरांची बनावट नावे व स्वाक्ष-या हजेरी पत्रकावर नोंदवून टपाल कार्यालयातून मजुरीचे ३ लाख २९ हजार ९८६ रुपये घेतले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अपहार प्रकरणी धूळघाट रेल्वे वनपरिक्षेत्राधिकारी व वनरक्षक यांना कामात झालेल्या अनियमिततेस जबाबदार धरण्यात आले असताना अनियमितता झाल्याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या ९ कर्मचाऱ्यांना चौकशीसाठी ताब्यात घेऊन त्यांची चौकशी न करताच त्याना सोडून देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार रोजगार हमी योजनेच्या कामात गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणी ग्रामरोजगार सेवकाची सही नसताना हजेरीपट स्वीकारणे व मजूरी अदा करणे याबाबत रू.३,२९,९८६/- च्या एकूण अकुशल प्रदानापैकी रु. १९,९२६/- इतक्या रकमेचा अपहार झाल्याचे प्राथमिकदृष्टया निदर्शनास येते. या प्रकरणी संबंधित महसूल व वन विभागाच्या अधिकारी/ कर्मचारी यांच्यावर गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सदर प्रकरणी संबंधितांविरुध्द गुन्हा दाखल झालेला असून, सध्या प्रकरणात पोलीस तपास सुरु आहे. तसेच मग्रारोहयो अंतर्गत तहसिल कार्यालयातील कार्यरत सहाय्यक कार्यक्रम अधिकारी यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत. महसूल व वन विभागाच्या इतर अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्द रोहयो नियमांतर्गत विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घोडाझरी (ता.सिंदेवाही, जि.चंद्रपूर) तलावाच्या मुख्य कालव्यासह वितरिकेची दुरूस्ती करण्याबाबत

**(५) * १२२८२९ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही तालुक्यातील फार जुना असलेल्या घोडाझरी तलावाच्या माध्यमातून हजारो एकर शेतीचे सिंचन होत असतांनाही नहर, मुख्य कालवा, तलाव दुरूस्ती, गाळ काढणे व पाळ दुरूस्ती इत्यादी कामे अद्यापपर्यंत करण्यात आली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवरगाव येथील घोडाझरी तलावातील नहराचे रूंदीकरण तसेच गडबोरी वितरिकेचे १ ते १४ कि.मी. पर्यंत खराब झालेल्या लाईनिंगचे काम तात्काळ करण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, चंद्रपूर यांना दिनांक १ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घोडाझरी तलावाची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार घोडाझरी तलावाची सदरहू कामे तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) होय, अंशत: खरे आहे. गडबोरी वितरीका कि.मी. १ ते ३२ मधील कालवा स्वच्छतेच्या कामाची मागणी दि. १ मे, २०१८ रोजीच्या निवेदनाद्वारे करण्यांत आलेली आहे.

(३) होय, यांत्रिकी पाखरण कार्यक्रमाअंतर्गत गडबोरी वितरीका कि.मी. १ ते १२ मधील कालवा स्वच्छतेची कामे पूर्ण झालेली आहेत. म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत स्थानिक ग्रामपंचायतीमार्फत कि.मी. १३ ते १८ पर्यंतची कामे प्रगती पथावर आहेत. कि.मी. १८ ते ३२ मधील कालवा स्वच्छता कामे जलसंपदा विभागामार्फत खरीप हंगामापूर्वी करण्याचे प्रस्तावित आहे.

सावरगांव वितरीका कि.मी. १ ते ३, तळोधी वितरीका कि.मी. १ ते ९ मधील कालवा स्वच्छता कामे यांत्रिकी पाखरण कार्यक्रमाअंतर्गत पूर्ण करण्यांत आली आहेत. मुख्य कालवा कि.मी. ६ ते १८ मधील कालवा स्वच्छता कामे यांत्रिकी पाखरण अंतर्गत प्रगती पथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तानसा नदीवर चांबळे, डाकीवली व मेट या ठिकाणी लघुपाटबंधारे बांधण्याबाबत

**(६) * १२३६०१ श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील नागरिकांना अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे पाण्याची कमतरता सातत्याने जाणवत असल्याने तानसा नदीवर चांबळे, डाकीवली व मेट या ठिकाणी लघुपाटबंधारे बांधण्याची मागणी तेथील नागरिकांनी लघुपाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांकडे विनंती अर्जाद्वारे प्रत्यक्ष भेटी घेऊन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तानसा नदीवर मागील १० ते १५ वर्षात बांधलेले अनेक बंधारे निकृष्ट दर्जाचे व चुकीच्या ठिकाणी बांधले गेल्यामुळे त्यामध्ये पाणी साचले जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार तानसा नदीवर चांबळे, डाकीवली व मेट या ठिकाणी लघुपाटबंधारे बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही. तथापि, मेट व चांबळे हे बंधारे पुर्वीचे असून दगडी कामात बांधलेले आहेत ते काही प्रमाणात नादुरुस्त आहेत. तसेच काही ठिकाणी बंधाऱ्याचे गेट नादुरुस्त असल्यामुळे काही प्रमाणात गळती होत आहे. त्यानुषंगाने मेट व चांबळे येथील बंधाऱ्यांची दुरुस्ती निधी

उपलब्धतेनुसार करण्याचे नियोजन आहे. डाकीवली येथील बंधारा सुस्थितीत असून पूर्ण संचय पातळीपर्यंत दरवर्षी पाणीसाठा होत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हळदी (ता.करवीर, जि.कोल्हापूर) येथील बंधाऱ्याची झालेली दुरवस्था

**(७) * १२००४० श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हळदी (ता.करवीर, जि.कोल्हापूर) येथील बंधाऱ्याचे चार पिलर पाटबंधारे विभागाच्या निष्काळजीपणामुळे कोसळल्याने या बंधाऱ्यांची दुरवस्था झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर बंधाऱ्याच्या दुरवस्थेमुळे १५ गावांना पिण्याच्या व शेतीच्या पाण्याची समस्या निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बंधाऱ्याची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार बंधाऱ्याची तात्काळ दुरुस्ती करण्यासह बंधाऱ्याच्या दुरवस्थेतकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

तथापि, बंधाऱ्याच्या दोन स्तंभाच्या कटवॉटर बांधकामाची काही प्रमाणात पडझड झाल्याचे माहे जून, २०१७ मध्ये निदर्शनास आले होते.

(२) नाही.

(३) बंधाऱ्याची पाहणी करून आवश्यक दुरूस्ती जून २०१७ मध्ये पूर्ण करण्यात आली आहे.

बंधाऱ्याच्या दुरावस्थेकडे दुर्लक्ष झाले नसल्याने अधिकाऱ्यांवर कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद, वाशीम, गडचिरोली व नंदुरबार या जिल्ह्यांचा मुलभूत विकास निती आयोगाकडून करण्याबाबत

**(८) * १२०४७५ श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उस्मानाबाद, वाशीम, गडचिरोली व नंदुरबार या चार जिल्ह्यांचा मुलभूत विकास निती आयोगाच्या माध्यमातून करण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मूलभूत विकासामध्ये कोणकोणत्या गोष्टीचा समावेश करण्यात आला आहे तसेच त्यासाठी केंद्र सरकार निती आयोगाच्या माध्यमातून किती निधी देणार आहे,

(३) असल्यास, सन २०१७-१८ या वर्षामध्ये या जिल्ह्यांसाठी किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला व सन २०१८-१९ या वर्षासाठी किती निधी मंजूर करण्यात आला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) निती आयोगाकडून देशातील ११५ आकांक्षित जिल्ह्यांच्या कालबध्द विकासाबाबतच्या उपक्रमासंदर्भात प्रथमत: दि. १४ नोव्हेंबर, २०१७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. दि. ४ व ५ जानेवारी, २०१८ रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या परिषदेदरम्यान या कार्यक्रमाचे उद्‌घाटन झाले आहे.

(२) निती आयोगाकडून देशातील ११५ आकांक्षित जिल्ह्यांच्या कालबध्द विकासासाठी “Convergence, Integration and Focused Attention to Backward Districts” हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यात केंद्र शासन केवळ सहाय्यकाची भूमिका बजावणार असून संबंधित जिल्हाधिकारी हे या उपक्रमाचे मुख्य आधारस्तंभ राहणार आहेत. केंद्र सरकार निती आयोगाच्या माध्यमातून या बाबीसाठी कोणताही निधी देणार नाही. या उपक्रमांतर्गत राज्यातील निवडलेल्या ४ जिल्ह्यांची प्रगती निश्चित करण्यासाठी खालील सहा क्षेत्रांमधील कामगिरी विचारात घेतली जाणार आहे :-

१) आरोग्य व पोषण (Health & Nutrition),

२) शिक्षण (Education),

३) कृषि व जलसंपदा (Agriculture & Water Resources),

४) आर्थिक समावेश

५) कौशल्य निर्माण (Financial Inclusion and Skill Formation) व

६) मुलभूत सुविधा (Basic Infrastructure)

(३) व (४) महाराष्ट्रातील नंदुरबार, उस्मानाबाद, वाशिम व गडचिरोली या ४ आकांक्षित जिल्ह्यांचा अधिक गतीने विकास होण्याकरिता व त्या माध्यमातून निती आयोगाने उपरोक्त ६ क्षेत्रांकरिता निश्चित केलेले ४९ मुख्य कार्य निर्देशक साध्य होण्याकरिता सन २०१८-१९ मध्ये एकूण रु. १२१.२७ कोटी इतका अतिरिक्त निधी "एक विशेष बाब" म्हणून राज्य शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

-----------------

## मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील वर्ताळा, सांगवी, गूटूर, एकलारा, मंग्याळ, हिब्बट व जांब येथे झाडांची तोड होत असल्याबाबत

**(९) * १२२०५० श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील वर्ताळा, सांगवी, गूटूर, एकलारा, मंग्याळ, हिब्बट व जांब येथे झाडांची मोठया प्रमाणात तोड होत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तालुक्यातील झाडांची मोठया प्रमाणात तोड होत असुन पर्यावरणाचा ऱ्हास होत असतानाही संबंधितांशी संगनमत करुन झाडांची तोड करणा-या दलालांवर कारवाई करण्याबाबत येथील संबंधित वन विभाग अधिकारी दिरंगाई करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंगणवाडी सेविका व मदतनिसांना भारतीय आयुर्विमा महामंडळामार्फत लाभ मिळण्याबाबत

**(१०) * ११६७२६ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेवानिवृत्ती, राजीनामा, मृत्यू किंवा सेवेतून काढल्यानंतरही अंगणवाडी सेविकांना भारतीय आयुर्विमा महामंडळामार्फत एकरकमी प्रत्येकी १ लाख रुपये तर मदतनिसांना ७५ हजार देण्याचा निर्णय महिला व बालविकास विभागानी घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकात्मिक बालविकास विभागाच्या प्रकल्पांतर्गत कागदपत्रांची पूर्तता केली जात नसल्याने ३४० अंगणवाडी सेविका तसेच एकात्मिक बालविकास विभाग व भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या कामात समन्वय नसल्याने राज्यात सुमारे ५ हजाराहून अधिक अंगणवाडी सेविका या लाभापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अंगणवाडी सेविकांचे व मदतनिसांचे सेवानिवृत्त, राजीनामा, मृत्यू, सेवेतून काढल्यानंतर देण्यात येणारे लाभ तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

काही अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांची लाभ मंजूर प्रकरणात कागदपत्रांची पुर्ततेसाठी प्रकरणे भारतीय आयुर्विमा महामंडळाकडे प्रलंबित होती. याबाबत सदर प्रकरणे तातडीने निकाली काढण्याबाबत शासनस्तरावरुन एल.आय.सी. पुणे यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) व (४) अंगणवाडी सेविकांचे व मदतनीसांचे सेवानिवृत्ती, राजीनामा, मृत्यू, सेवेतून काढल्यानंतर देण्यात येणारे लाभ तातडीने देण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर व आयुक्तालय स्तरावर भारतीय आयुर्विमा महामंडळ पुणे यांचे पदाधिकारी यांचे समवेत बैठक आयोजित करुन आढावा घेण्यात येतो.

दिनांक १५/०६/२०१८ रोजी झालेल्या बैठकीत अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचा PFMS प्रणालीतील परिपूर्ण माहिती भारतीय आयुर्विमा महामंडळास प्राप्त झालेली असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे दिनांक ३०/६/२०१८ अखेर भारतीय आयुर्विमा महामंडळ, पुणे यांचेकडे प्रलंबित असलेली प्रकरणे प्राधान्याने निकाली काढण्यात येतील. तसेच सदर बैठकीत आयुर्विमा महामंडळ पुणे यांना मंजूर करण्यात आलेली प्रकरणे, लाभाची रक्कम व एल.आय.सी. पुणे यांचेकडे मंजूरी अधिनस्त असलेली शिल्लक प्रकरणांची यादी दरमहा आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचेकडे सादर करणेबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे काही प्रकरणाबाबत अडचणी असल्यास आयुक्तालयाशी संपर्क साधणेबाबत व एल.आय.सी. पुणे यांचेकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावावर तात्काळ कार्यवाही करुन प्रकरणे निकाली काढण्यात यावीत असेही सूचित केलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरात वन विभागाच्या जमिनींवर झालेले अतिक्रमण

**(११) * ११९८४ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात महंमदवाडी सर्व्हे क्रमांक ४५ व ५ येथे वन विभागाच्या जमिनीवर करण्यात आलेल्या अतिक्रमणावर कारवाई करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जागेवर एका मोबाईल कंपनीचा टॉवर, एका बँकेची पाण्याची टाकी व वीटभट्टी उभारण्यात आली असून त्याची भाडेवसुली केली जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे शहरातील वन विभागाच्या जमिनींवर झालेल्या अतिक्रमणाची चौकशी शासनाने केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार वन विभागाच्या जमिनींवर अतिक्रमण करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) महंमदवाडी येथील सर्व्हे नं. ५ चे क्षेत्र महसूल विभागाच्या ताब्यात होते. वन विभागाने सदर ३०.३३८ हे.आर इतके वनक्षेत्र दिनांक ८.५.२०१७ रोजी अतिक्रमित क्षेत्रासह ताब्यात घेतले आहे. तसेच दिनांक १३.११.२०१७ रोजी वन विभागाने सदर क्षेत्रावरील अतिक्रमण विरोधात कारवाई करुन येथील अतिक्रमण निष्कासित केले आहे.

फॉरेस्ट सर्व्हे नं. ४५ मधील राखीव वनक्षेत्रावर असलेल्या अतिक्रमण धारकांवर वनगुन्हे नोंदविण्यात आलेले होते. वन विभागाने पोलीस व एसआरपीएफ यांच्या मदतीने दिनांक १३.११.२०१७ रोजी अतिक्रमण विरोधी कारवाई करुन अतिक्रमण धारकांना अटक करुन मा.न्यायालयासमोर हजर केले आहे.
(२) महंमदवाडी येथील सर्व्हे नं. ५ मधील क्षेत्रावर जीओ कंपनीचा मोबाईल टॉवर आढळून आला आहे. सदर टॉवर बाबत जीओ कंपनी व खाजगी व्यक्ती यांच्यामध्ये करारनामा झालेला असून जीओ कंपनी त्यांना भाडे पोटी काही रक्कम अदा करीत होती असे प्राथमिक चौकशीच्या वेळी लेखी स्वरुपात दिलेले आहे. दिनांक १३.११.२०१७ रोजी सदर टॉवर सीलबंद केल्यापासून भाडे वसूली बंद आहे.
(३) व (४) पुणे वन विभागाच्या अखत्यारित पुणे शहरात एकूण १९०३.६४ हे. वनक्षेत्र आहे. पुणे शहरातील राखीव वनक्षेत्राचे सर्व्हेक्षण व सिमांकन करुन

त्याठिकाणी असलेले अतिक्रमणावर कायदेशीर कारवाई करुन सदर अतिक्रमण निष्कासन करण्याचे काम टप्याटप्याने सतत चालू आहे. तसेच राखीव वनक्षेत्राभोवती सीमाभिंत बांधण्याचे काम देखील हाती घेण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यातील २२ बंधाऱ्यांच्या ई-निविदा प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार

**(१२) * ११८८६४ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यातील २२ बंधाऱ्यांच्या ई-निविदा प्रक्रियेत सोयीच्या कंत्राटदारासाठी हस्तक्षेप केल्याचे प्रकरण निदर्शनास आल्यानंतर कार्यकारी अभियंता बापुसाहेब देसले यांच्या खातेनिहाय चौकशीचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी म.ना.से. (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ खाली विभागीय चौकशी कार्यान्वीत करण्यासाठी दोषारोपपत्रे बजाविण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला असल्याची बाब दिनांक १३ जानेवारी २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच श्री.चंद्रशेखर वाघमारे, कार्यकारी अभियंता (ल.पा.) (पश्चिम) जिल्हा परिषद, नाशिक या पदावर दिनांक २८ डिसेंबर, २०१५ पासून कार्यरत असताना त्यांच्याही कामकाजाबाबत मोठया प्रमाणात अनियमितता निदर्शनास आल्याने, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी म.ना.से. (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या नियम ८ खाली विभागीय चौकशी कार्यान्वीत करण्यासाठी दोषारोपपत्रे बजाविण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही अधिकाऱ्यांनी कोटयवधी रुपयांचा बेकायदेशीर व्यवहार करुन गैरव्यवहार केला असल्याचे प्रथम पाहाणी अहवालात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या दोघांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याची मागणी होत असल्याने उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय व त्यानुसार दोषीं अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) होय.
(३) नाही.
(४) श्री.देसले व श्री.वाघमारे यांच्याविरुध्दच्या खातेनिहाय चौकशीबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्यात येत असून नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयातील गावे व वाड्यावस्त्यांवर स्मशानभूमी बांधण्याबाबत

**(१३) * १२३४७३ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील २१ गावे व १०० हून अधिक वाड्यावस्त्यांवर स्मशानभूमी नसल्यामुळे उघड्यावर अंत्यसंस्कार करावे लागत असल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दरडोई उत्पन्नामध्ये देशात अव्वल असणाऱ्या कोल्हापूर जिल्हयामध्ये स्मशानभूमीकरीता जिल्हा परिषदेकडून कमी प्रमाणात निधी देण्यात येत असल्याने अंत्यसंस्कार स्वत:च्या शेतामध्ये अथवा रस्त्याशेजारी करावे लागतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार स्मशानभूमी नसणाऱ्या अशा गावे, वाड्यावस्त्यांवर स्मशानभूमी बांधकामाकरीता निधी देण्यासह स्मशानभूमी बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) जिल्हा वार्षिक योजनांतर्गत ग्रामपंचायतींना जनसुविधा पुरविणे योजनेमधून सन २०१०-११ ते सन २०१७-१८ अखेर वेळोवेळी स्मशानशेड बांधणे व अनुषंगिक सोई सुधारणासाठी ग्रामपंचायतचे ठिकाणी जि.प.कडून स्मशानशेड बांधणेकामी निधी उपलब्ध करुन दिला आहे. काही ग्रामपंचायतचे ठिकाणी जागेची उपलब्धता न होणे व इतर तांत्रिक कारणामुळे सदरची कामे पूर्ण होवू शकलेली नाहीत ही वस्तुस्थिती आहे. तथापि, सन २०१९-२० चा आराखडा बनविताना निधीच्या उपलब्धतेनुसार प्राधान्याने स्मशानशेड बांधणे व अनुषंगिक सोई-सुविधा साठी निधी उपलब्ध करणेची कार्यवाही करणेत येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुचांबे (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) या प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१४) * ११६९२२ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयातील गडनदी पाटबंधारे प्रकल्प, कुचांबे (ता.संगमेश्वर) या प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे सन २००८ साली नांदगाव (ता.चिपळूण) येथे पुनर्वसन करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुनर्वसन होवून दहा वर्ष झालेली असतानाही पाणी, मुख्य व अंतर्गत रस्ते, पथदीवे, सात-बारा उतारा, विस्तारीत कुटुंबासाठी भूखंड व शेतजमीन आदी सोयीसुविधांपासून वंचित असल्याने विविध मागण्यांच्या

पूर्ततेसाठी प्रकल्पग्रस्तांनी शासनाकडे सातत्याने पत्रव्यवहार करून देखील त्यांची दखल घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार प्रकल्पग्रस्तांना सोयीसुविधा उपलब्ध करून त्यांच्या अन्य मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२) नाही. नांदगांव पुनर्वसन गावठाणासाठी सर्व नागरी सुविधांची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. या गावठाणातील नळ पाणी पुरवठा व वीज पुरवठा वगळता उर्वरित १६ नागरी सुविधांची कामे जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडे दि.२/०२/२०१७ रोजी हस्तांतरीत करण्यात आलेली आहेत. सद्य:स्थितीत नळ पाणी पुरवठा व वीज पुरवठा ही कामे पूर्ण झाली असून हस्तांतरण प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सौंदाणे-टाकळी-सोनज-कौळाणे (ता.मालेगांव, जि.नाशिक) या रस्त्याची झालेली दूरवस्था

**(१५) * ११८८५० श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सौंदाणे-टाकळी-सोनज-कौळाणे (ता.मालेगांव, जि.नाशिक) या मुख्य बाजारपेठेस जोडणाऱ्या १२ किमी लांबीच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जिल्हा परिषदेमार्फत सदर रस्त्याची पाहणी करण्यात आली आहे.

(३) प्रश्नांकित सौंदाणे टाकळी सोनज कौळाणे ता.मालेगाव या इतर जिल्हा मार्ग क्र. १६१ रस्त्याची एकूण लांबी १४.३०० कि.मी. आहे. त्यापैकी १/०० ते २/०० कि.मी. लांबीतील रस्ता दुरुस्तीचे काम जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०१७-१८ मध्ये मंजूर असून निविदा स्तरावर आहे.

तसेच सन २०१७-१८ मध्ये रस्ते दुरुस्तीअंतर्गत खड्डे भरण्याचे काम मंजूर असून प्रगतीत आहे.

सदर रस्त्याच्या ५/०० ते १४/३०० कि.मी. लांबीतील रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअतंर्गत मंजूर असून निविदा स्तरावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पलूस (जि.सांगली) तालुक्यात प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या वाढविण्याबाबत

**(१६) * १२३७६८ श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पलूस (जि.सांगली) तालुक्यामध्ये साधारण १ लाख ८० हजारावर लोकसंख्या असून या तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या दोनच असुन आरोग्य केंद्रांची संख्या वाढवून देण्याकडे शासन दुर्लक्ष करीत असल्याचे माहे जून, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साधारण ३० हजार लोकसंख्येला एक प्राथमिक आरोग्य केंद्र असणे आवश्यक असताना तसेच सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या दोन प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये मंजूर पदेही पूर्ण भरलेली नसल्याने यंत्रणेवर ताण येत असून रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पलूस तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे तात्काळ भरण्यासह आरोग्य केंद्राची संख्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२ ) सांगली जिल्हयातील पलूस तालुक्यात दोन प्राथमिक आरोग्य केंद्रे व ८ उपकेंद्रे कार्यरत आहेत. दि.१७.०१.२०१३ च्या शासन निर्णयानुसार ज्या आरोग्य संस्थेच्या कार्यक्षेत्रात लोकसंख्येमध्ये वाढ झाली आहे, अशा संस्थांसाठी अतिरिक्त मनुष्यबळ मंजूर करण्यात आले आहे. त्यानुसार पलूस तालूक्यातील २ प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी वैद्यकीय अधिकारी २ पदे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ २ पदे, आरोग्य सेविका २४ पदे व आरोग्य सेवक १८ पदे अशी एकूण ४६ पदे मंजूर करण्यात आली आहेत. पलुस तालुक्यातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या ६ पदांपैकी ४ पदे भरण्यात आली आहेत.उर्वरित रिक्त पदे भरण्याची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर सुरु आहे.

सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित नवीन रूग्णालये सुरु करण्यासाठी जोड-बृहत आराखडा तयार करण्यात येत असून पलूस तालुक्यात नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र / उपकेंद्र सुरु करण्याची मागणी निकषानुसार जोड-बृहत आराखडयामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माळशेज घाट (ता.मुरबाड, जि.ठाणे) परिसरात यांत्रिकी करवतीच्या सहाय्याने वृक्ष तोड होत असल्याबाबत

**(१७) * ११९९९९ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भीमाशंकर, हरिश्चंद्र गड व कळसूबाई अशा तीन मोठ्या अभयारण्याच्या क्षेत्रात असणाऱ्या माळशेज घाट (ता.मुरबाड, जि.ठाणे) परिसरातील सेक्शन ३५ लागू असलेल्या ८५ गावांपैकी ७५ गावासह भुवनपाडा या जंगल भागात

मोठया प्रमाणात यांत्रिकी करवतीच्या सहाय्याने बुंध्यापासून दररोज हजारो वृक्षांची तोड करण्यात येऊन त्याची तस्करी करण्यात येत असल्याचे दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू परिसरातील आदिवासींनी बेकायदा वृक्षतोड प्रकरणी सबंधीत वन अधिकारी यांचेकडे अनेकवेळा तक्रार करुनही याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन झाडांची तस्करी करणारे व त्यांना बेकायदा संरक्षण देणारे सबंधीत दोषी वन अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच मुरबाड जवळील निसर्गरम्य माळशेज घाट व परिसरातील विविध वृक्षांचे संरक्षण करुन पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) माळशेज घाट ता.मुरबाड, जि.ठाणे हे क्षेत्र पुणे (वन्यजीव विभागातील) भिमाशंकर अभयारण्य क्षेत्राच्या संरक्षीत क्षेत्र सीमेपासून २० ते २५ कि.मी अंतरावर अूसन या क्षेत्रामध्ये अवैध वृक्षतोड झालेली नाही. तथापि, ठाणे प्रादेशिक वन विभागातील पुर्व परिक्षेत्रातंर्गत परिमंडळ शिरवली, नियतक्षेत्र भुवन मध्ये मौजे भुवन मालकी सर्व्हे नं मधील ३५ सेक्शन लागू असलेल्या क्षेत्रामधून एकूण ९५ इंजायली बुडे जप्त करण्यात आली असुन तुटलेल्या बुडावरील माल स्थळावरच जप्त केला आहे. सदर प्रकरणी दिनांक ७.५.२०१८ व दिनांक ८.५.२०१८ अन्वये वनगुन्हे जारी करण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) मुरबाड जवळील निसर्गरम्य माळशेज घाट व परिसरातील विविध वृक्षांचे संरक्षण करुन पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या दृष्टीने वन विभागातंर्गत जंगलाचे संरक्षण करण्यासाठी वनसंरक्षण समित्यांमार्फत संरक्षणाचे काम तसेच वन कर्मचाऱ्यांसोबत कायम गस्त ठेवून वनसंरक्षण करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अंगणवाडी सेविकांचे निवृत्ती वय ६५ करण्याबाबत

**(१८) * १२००५० श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडी सेविकांचे निवृत्तीचे वय ६५ करण्याचा निर्णय मा.महिला व बाल विकास मंत्री यांनी दिनांक १९ मार्च, २०१८ रोजी घेतला असतानाही याबाबतचा आदेश काढण्यास शासनाकडून दिरंगाई होत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन अंगणवाडी सेविकांचे वय ६५ करण्याचा शासन निर्णय निर्गमित करीत नसल्याने ६० वर्षे पूर्ण झालेल्या शेकडो अंगणवाडी सेविका निवृत्त होणार असून राज्यातील बालकांच्या पोषण आहाराची समस्या निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, अंगणवाडी सेविकांचे निवृत्तीचे वय ६५ करण्यासंदर्भातील शासननिर्णय निर्गमित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२), (३) व (४) अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांची मानधनी पदावरील सेवानिवृत्तीचे वय, वयाची ६० वर्षे करण्याचा निर्णय दिनांक २३/०२/२०१८ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला होता. याबाबत विधानमंडळात झालेल्या चर्चेला उत्तर देताना काही अटींच्या अधीन राहून सेविकेचे सेवानिवृत्तीचे वय, वयाची ६५ वर्षे करण्याबाबत सभागृहास आश्वासन मार्च, २०१८ च्या अधिवेशनात दिलेले होते. त्यानुषंगाने धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब विचाराधीन असून

लवकरच याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात येणार आहे. सदर निर्णय होईपर्यंत वयाची ६० वर्षे पुर्ण केलेल्या सेविकांना मानधनी सेवेतून तूर्त सेवानिवृत्त करण्यात येऊ नये अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## राज्यात क्षयरोगाची लागण झालेल्या लहान मुलांच्या संख्येत झालेली वाढ

**(१९) * १२३३७७ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागातील आरोग्य व्यवस्थापन (एचएमआईएस) कडून मिळालेल्या आकडेवारीनुसार राज्यात १७०९ लहान मुलांना क्षय रोगाची लागण झाली असून त्यामध्ये मुंबई, पालघर व ठाणे या तीन जिल्ह्यातील मुलांची संख्या जास्त असल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात प्रतिवर्षी सुमारे १ लाख ७५ हजार नव्या क्षयरुग्णांची नोंद केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व क्षयरोग पसरण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, त्यानुषंगाने क्षयरोगाच्या नियंत्रणासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

सन २०१८ मध्ये जानेवारी ते एप्रिल या कालावधीत राज्यात १५ वर्षा खालील २४३० मुलांना क्षयरोगाचे लागण झाल्याचे आढळले आहे. त्यापैकी

६०३ बालके ही मुंबई जिल्ह्यातील व ४४० बालके ही ठाणे व पालघर जिल्यातील आहे.

(२) हे खरे आहे.

(३) याबाबत शासनाने सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत लहान मुलांमधील क्षयरोगासाठी विविध उपक्रम राबवित आहेत.

क्षयरोग पसरण्याची कारणे-

- क्षयरोग हा संसर्गजन्य आजार आहे,या आजाराचे विषाणू श्वसनाव्दारे पसरतात.

- घरातील प्रौढ व्यक्तींना क्षयरोग असल्यास त्या घरातील लहान मुलांमध्ये क्षयरोग होण्याची शक्यता अधिक असते

- इतर कारणे जसे-लहान मुलांचे कुपोषण,एच आय व्ही बाधीत मुल,दाट लोकवस्ती, लहान घरात मोठे कुंटूब.

(४) यासाठी केंद्र शासनातर्फे संपूर्ण देशात सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येतो,

- क्षयरुग्ण बाधीत रुग्णाच्या संपर्कात असणा-या सर्व व्यक्तीची तपासणी कार्यक्रमा अंतर्गत केली जाते. त्यात १५ वर्षाखालील बालकांची देखील क्षयरोगासाठी तपासणी केली जाते.

- पोषण पुर्नवसन केंद्र कुपोषीत बालकांची क्षयरोगासाठी तपासणी केली जाते.

- क्षयरोगग्रस्त असलेल्या सर्व रुग्णांना मोफत औषधोपचार केले जातात

- क्षयरुग्ण शोध मोहिम राबविले जाते

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बाळापूर व पातूर (जि.अकोला) तालुक्यात लक्षांकापेक्षा जादा विहिरींना मंजूरी देवून सिंचन विहिरीच्या कामात केलेला गैरव्यवहार

**(२०) * १२०६१३ श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाळापूर व पातूर (जि.अकोला) तालुक्यात लक्षांकापेक्षा अधिक विहिरींना मंजूरी देवून सिंचन विहिरीच्या कामात गैरव्यवहार करण्यात आल्याची बाब

माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना विहिर खोदणेकामी फक्त २० ते ३० टक्के अनुदान प्राप्त झाले असून उर्वरित अनुदान प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शेतकऱ्यांना उर्वरित अनुदान त्वरीत वितरीत करण्यासह गैरव्यवहार करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे अंशत: खरे आहे.

लक्षांकापेक्षा जास्त सिंचन विहीरींना मंजूरी देण्यात आली असून सिंचन विहिरींच्या कामात अनियमितता झाल्याची बाब निदर्शनास आली आहे.

(२) हे खरे नाही.

सदर प्रकरणी मग्रारोहयो अंतर्गत चालु असलेल्या वैयक्तिक सिंचन विहीरींचे नियमानुसार अनुदान गटविकास अधिकारी यांचेमार्फत वाटप करणे सुरु आहे.

(३) अकोला जिल्हयातील बाळापूर व पातूर तालुक्यातील (online) चालु असलेल्या अनुक्रमे २२९ व ४९७ विहीरींना गटविकास अधिकारी यांचेमार्फत अनुदान वाटपाचे काम सुरु असून यामध्ये लक्षांकापेक्षा जास्त विहीरींना प्रशासकीय मंजुरी देणाऱ्या तत्कालीक गटविकास अधिकारी, शाखा अभियंता, व ग्रामसेवक यांना बाळापूर पंचायत समिती व पातूर पंचायत समिती यांचे कडून कारणे दाखवा नोटीस बजावून स्पष्टीकरण मागविण्यात आले असून जिल्हा परिषद स्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## देवळाली (ता.भूम, जि.उस्मानाबाद) येथे पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमातंर्गत झालेल्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२१) * १२०१८३ श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवळाली (ता.भूम, जि.उस्मानाबाद) गावामध्ये कृषी विभागामार्फत एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमातंर्गत कंपार्टमेंट बंडीग कामासाठी विठ्ठल अर्थमुव्हर्स कुर्डूवाडी यांचेसह इतर कंत्राटदारांना ४८७/३ व ४८७/४, ४८७/१/२ व ३९५/६ दिनांक २० मार्च, २०१५ नुसार कार्यारंभ आदेश देण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त आदेशानुसार नमुद कंत्राटदारांना सन २०१५-१६ मध्ये कंपार्टमेंट बंडीगची कामे पुर्ण करून कृषी विभागाकडून केलेल्या कामाच्या नोंदी मापन पुस्तकेत घेतलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कार्यारंभ आदेश दिलेल्या कंत्राटदारांना त्यांच्या कामाची देयके अदा न करता संबधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दुस-याच्या नावावर देयके काढून केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधी व संबधित कंत्राटदारांनी मा.मुख्यमंत्री, राज्यमंत्री (कृषी), सचिव, कृषी आयुक्त यांना निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवेदनानुसार संबधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यासह कंत्राटदारांना केलेल्या कामाची देयके देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) तालुका कृषि अधिकारी, भूम कार्यालयातील जावक नोंदवहीमध्ये खाडाखोड करुन संबधित ठेकेदारांना कार्यारंभ आदेश दिल्याची नोंद दिसून येते तथापि स्थळप्रती उपलब्ध झालेल्या नाहीत.

(२) व (३) श्री.विठ्ठल अर्थमुव्हर्स, श्री.काशीद व श्री.संभाजी बागल यांनी शासनास निवेदन दिलेले आहे. तक्रारीतील नमुद मशिनधारकांची नावे मापनपुस्तिकेमध्ये दिसून येत नाहीत.

(४) संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचे विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे तथापि संबंधित ठेकेदाराच्या कार्यारंभ आदेशाबाबत शहानिशा करुन याबाबत निर्णय घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वन्य प्राण्यांकडून पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना बाजारभावाप्रमाणे नुकसान भरपाई देण्याबाबत

**(२२) * ११८६७६ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील आजरा तालुक्यात वन्य प्राण्यांकडून शेतकऱ्यांच्या शेतातील ऊस, केळी, काजू, मेसकाठी, फणसाचे वारंवार नुकसान होत असुन स्थानिक शेतकऱ्यांनी वन्यप्राण्यांचा कायमचा बंदोबस्त करण्याबाबत वनविभाग कार्यालय, कोल्हापूर यांच्याकडे गेल्या वर्षापासून मागणी करुनही वनविभागाकडून अद्याप कोणतीच कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच वन्य प्राण्याकडून पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना बाजारभावाप्रमाणे भरपाई देण्यात यावी अशी शिफारस शासनाला वन्य प्राणी उपद्रव थांबविणे आणि शेतकऱ्यांच्या पिकांची नुकसान भरपाई निश्चित करण्यासाठी नेमलेल्या समितीने केली असून याबाबतचा अहवाल माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अहवालात आणखी कोणत्या शिफारसी करण्यात आल्या असून त्या शिफारसींवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, तालुक्यातील वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्यात वन्यप्राण्यांनी शेतपिकांचे नुकसान केल्यास प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यास नुकसान भरपाई अदा केली जाते.

वन्यप्राण्यांपासून होणा-या पिकांची नुकसानीमुळे शासनाकडून देण्यात येत असलेल्या अर्थसहाय्यात व उपाययोजनांत सुधारणा सुचविण्याकरीता दिनांक १९.०३.२०१८ रोजीच्या शासन आदेशान्वये मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे गठण करण्यात आले आहे. सदर समितीव्दारे अंतिम अहवाल तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.

वन्यप्राण्यांपासून नुकसान होवू नये यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात:-

• वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी उपाययोजना केल्या जातात.

• काही क्षेत्रात वनहद्दीवर वन्यप्राणी प्रतिबंधक चर खोदण्यात आले Rescue Team  तयार करण्यात आली आहे.

• मानव वन्यप्राणी संघर्ष रोखण्याच्या दृष्टीने वन अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात येते.

• वनावरील अवलंबन कमी करण्याच्या दृष्टीने सबसिडीवर एलपीजी गॅस शेगडी व सिलेंडर पुरवठा केला जात आहे.

• परिक्षेत्र स्तरावर क्षेत्रिय अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत नियमित गस्त करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यातील दुर्गबोरी ल.पा.(संग्राहक) तलाव प्रकल्पाचे काम सुरु करतांना झाडांची अवैधरीत्या केलेली तोड

**(२३) * ११८५९३ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यातील विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर अंतर्गत लघु पाटबंधारे विभाग बुलढाणा मार्फत दुर्गबोरी ल.पा.(संग्राहक) तलाव प्रकल्पाचे काम सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तलावाचे काम सुरु करतांना कंत्राटदाराने वनविभागाच्या संबधित अधिका-यांशी संगनमत करुन या संग्राहक तलाव प्रकल्पातील लाखो रुपयांची मौल्यवान झाडे तोडून त्यांची विल्हेवाट लावली तसेच हजारो ब्रास गौणखनिज अवैधरित्या उत्खनन करुन प्रकल्पासाठी वापरण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यासार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२) नाही.

प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील झाडांची विल्हेवाट ही वनविभागाची पूर्वपरवानगी घेऊन प्रचलित पध्दतीनुसार करण्यात आली आहे. तसेच प्रकल्पासाठी वापरण्यात आलेले गौण खनिजाचे उत्खनन अंदाजपत्रकाप्रमाणे करण्यात आले असून अद्यापपर्यंत झालेल्या कामापोटी रू.७७.९८/- लक्ष इतक्या स्वामित्व शुल्क रकमेचा भरणा कंत्राटदाराचे देयकातून कपात करून शासनजमा करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मांजरीतील साडेसतरा नळी (जि.पुणे) परिसरात पाटबंधारे खात्याच्या जागेवर कंत्राटदाराने केलेले अतिक्रमण

**(२४) * १२३००२ श्री.विजय काळे (शिवाजीनगर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांजरीतील साडेसतरा नळी (जि.पुणे) परिसरात पाटबंधारे खात्याच्या मोकळया जागेवर खाजगी ठेकेदारांकडून मोठया प्रमाणात दगड व माती टाकली जात असल्याची बाब दिनांक ९ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत पाटबंधारे खात्याकडे तक्रार करुनही अधिका-यांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्यामुळे शेजारील प्राथमिक शाळा व पालिका कार्यालयाच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार अतिक्रमण करणाऱ्या खाजगी कंत्राटदारावर व त्यांना सहकार्य करणाऱ्या संबंधित अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) नाही.

(३), (४) व (५) पूणे जिल्हयातील जुना मुठा कालवा किमी.२८ मधील निरिक्षण पथाच्या बाजूस साडेसतरा नळी हडपसर हद्दीतील सर्वे क्र. २७५, २७६ मध्ये पाटबंधारे खात्याच्या मोकळया जागेवर अज्ञात इसमांकडून रात्री-अपरात्री राडारोडा/माती टाकल्याचे निदर्शनास आले. याबाबत पोलीस यंत्रणेस कळविण्यात आले आहे. पोलिस यंत्रणे कडून पुढील तपास सुरु आहे.

-----------------

## विदर्भातील गोसीखुर्द सिंचन प्रकल्पाच्या कामास होत असलेला विलंब

**(२५) * ११६५८६ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील गोसीखुर्द सिंचन प्रकल्पाचे काम संथगतीने सुरु असुन सद्यस्थितीत सदर प्रकल्पाची १८ हजार ४९४ कोटी इतकी किंमत वाढलेली असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार या परिसरातील दुष्काळी भागाच्या सिंचनाची समस्या सोडविण्यासाठी गोसीखुर्द प्रकल्पाचे काम तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२) गोसीखुर्द प्रकल्पास दि.२१/०९/२०१६ अन्वये रु१८४९४.५७ कोटी इतक्या किंमतीस (दरसूची ज.सं.वि.२०१२-१३ व सा.बां.२०१३-१४) तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे व त्यानुसार प्रकल्पाची कामे सुरु आहेत.

अ) प्रकल्पाच्या किंमतीमध्ये झालेल्या वाढीची कारणमिमांसा पुढीलप्रमाणे आहे: भाववाढीमुळे, संकल्प चित्रातील बदलामुळे, मूळ प्रकल्प अहवालातील अपु-या तरतुदी इत्यादी कारणामुळे वाढ झाली आहे.

ब) वैधानिक मंजुरी, भुसंपादन, पुनर्वसन व संकल्पन इत्यादी मधील विलंब, तसेच सुरुवातीचे काळातील अपुरे अनुदान या कारणामुळे प्रकल्प पूर्ण होण्यास विलंब झाला आहे.

(३) गोसीखुर्द प्रकल्पाचे काम जलद गतीने पूर्ण करणेसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे.

अ) प्रकल्पाची उर्वरीत कामे पूर्ण करणेसाठी हा प्रकल्प केंद्रशासनाचे अर्थसहाय्यातून पंतप्रधान कृषि सिंचन योजनेतून (PMKSY) घेण्यात आला आहे.

ब) प्रकल्पाची भूसंपादन व पुनर्वसन कामे पूर्ण करणेसाठी मा.मुख्यमंत्री यांचे वॉररुममधुन संनियत्रण करणेत येत आहे.

क) प्रकल्पाची रु १०५८ कोटीचे कामे NBCC या केंद्र शासनाच्या कंपनी मार्फत करणेत येत आहेत.

ड) उर्वरित कामे पूर्ण करणेचे सुक्ष्म व विश्वासार्थ नियोजन करणेत आले असून कामे प्रगतीपथावर आहेत.

ई) उर्वरित कामासाठी अभियांत्रिकी कामे, साहीत्य प्राप्त करणे व बांधकाम करणे या (EPC) पध्दतीच्या निविदा मार्फत कामे हाती घेण्यात येत आहेत.

फ) पारंपारिक, खुल्या कालव्या ऐवजी बंद पाईपव्दारे वितरण प्रणालीचे काम करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उजनी मराठवाडा उपसा सिंचन योजनेंतर्गत आष्टी (जि.बीड) येथील एल-३ योजनेचे काम सुरु करण्याबाबत

**(२६) * १२१११०७ ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उजनी मराठवाडा उपसा सिंचन योजनेंतर्गत (कृष्णा खोरे अंतर्गत) आष्टी (जि.बीड) येथे एल-३ योजनेचे काम तातडीने सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतीनिधींनी मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने सदरहू उपसा सिंचन योजनेंतर्गत आष्टी (जि.बीड) येथे एल-३ योजनेचे काम तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत आष्टी (जिल्हा बीड) मतदार संघातील आष्टी उपसा सिंचन योजना क्र.३ (खुंटेफळ साठवण तलाव) कामाची फेर रचना करण्याबाबत मा. लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १/२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री महोदयांना विनंती केलेली आहे.

(२) उपसा सिंचन योजना क्र.३, आष्टी या योजनेच्या एकूण ५ टप्प्यांपैकी टप्पा क्र.अ अंतर्गत खुंटेफळ साठवण तलावाचे काम हाती घेण्यात आले आहे. प्रथम टप्प्यात उपलब्ध होणाऱ्या १.६८ अ.घ.फू. पाणी वापरासाठी खुंटेफळ साठवण तलावासह योजनेसाठी खुंटेफळ साठवण तलावा पर्यंत एकूण अंदाजे १२१० हेक्टर जमिनीचे भूसंपादन करावे लागणार असून त्यापैकी १९३.५७ हेक्टर जमीन सरळ खरेदीने संपादित करण्यात आली आहे. योजनेस पर्यावरण मान्यता मिळाल्यानंतर निधी उपलब्धतेनुसार कामे करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरात कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेमुळे महिलांचे झालेले मृत्यू

**(२७) * ११७१०५ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय कदम (दापोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात कुटुंब नियोजनासाठी केल्या जाणाऱ्या गर्भनिरोधक शस्त्रक्रियेमुळे गेल्या ५ वर्षात २४ महिलांचा मृत्यु झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या रुग्णालयांची झालेली दुरवस्था, तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता व अत्याधुनिक मशिनींच्या अभावामुळे योग्य उपचार होत नसल्याने या शस्त्रक्रियेदरम्यान महिलांचे मृत्यू झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार मृत पावलेल्या महिलांच्या वारसदारांना आर्थिक मदत देवून पालिका रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टरांच्या संख्येत वाढ करुन अत्याधुनिक यत्रंसामुग्री पुरविण्याची कार्यवाही करण्यासह सदरहू मृत्यु रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई शहरामध्ये कुटुंब नियोजनासाठी केल्या जाणाऱ्या गर्भनिरोधक शस्त्रक्रियेमुळे मृत्यू झालेल्या महिलांची गेल्या ५ वर्षांत २४ महिलांचा मृत्यू झाला आहे ही वस्तुस्थिती आहे.

(२), (३) व (४) कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेमुळे/त्यादरम्यान होणाऱ्या मृत्युंचे प्रमाण रोखण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना केली/करण्यात येत आहे:-

• सन २०१० पासून मुंबईसाठी जिल्हास्तरीय गुणवत्ता अभिवचन समितीची (District Quality Assurance Committee) स्थापना करण्यात आली आहे. सदर समितीमार्फत प्रत्येक कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया मृत्यू प्रकरणाची विस्तृत चौकशी करण्यात येते.

• कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करतांना सर्व शासकीय व निमशासकीय संस्थांच्या सेवांचा दर्जा उंचावण्यासाठी मार्गदर्शक सूचना, शासकीय परिपत्रके सर्व संबंधित रुग्णालयांना देण्यात आली आहेत.

• कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी रुग्णालये/केंद्राच्या तपासणीच्या वेळी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येते:-

• परिशिष्ट ६ नुसार, केंद्र/रुग्णालयाची सदर शस्त्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या पात्रतेची तपासणी

• परिशिष्ट १७ नुसार, कैंद्र/रुग्णालयातील शस्त्रक्रियागारातील निर्जंतुकीकरण व प्रत्यक्ष शस्त्रक्रिया योग्य प्रकारे केली जाते किंवा नाही याची तपासणी

• परिशिष्ट १९ अनुसार, सदर शस्त्रक्रियेबाबत रुग्णाचे नोंदविलेले मनोगत याबाबत आढावा घेतला जातो.

• मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार खालील बाबींची पडताळणी केली जाते:-

• कैंद्रे/रुग्णालये यांची नोंदणी

• डॉक्टरांची नोंदणी

• सदर शस्त्रक्रिया करण्यास आवश्यक असलेल्या प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र

• मा.सर्वोच्च न्यायालयाच्या यादीमध्ये कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टरांची नावे अंतर्भूत आहेत याची खातरजमा केली जाते.

सदर मृत्यू पावलेल्या महिलांच्या वारसदारांना मागील ५ वर्षांमध्ये खालीलप्रमाणे आर्थिक मदत देण्यात आली आहे :-

| सन | आर्थिक मदतीची रक्कम |
|---|---|
| २०१३-१४ | रु. १०.५० लाख |
| २०१४-१५ | --- |
| २०१५-१६ | रु. ६.५० लाख |
| २०१६-१७ | रु. ६ लाख |
| २०१७-१८ | रु. ४ लाख |

स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया केल्यानंतर राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रोत्साहन म्हणून दारिद्रयरेषेखालील/अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीतील स्त्री लाभार्थींसाठी रु.६००/- व दारिद्रयरेषेवरील महिलांसाठी रु.२५०/- इतकी रक्कम देण्यात येते.

तसेच, बिनटाका पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया केल्यानंतर पुरुष लाभार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून रु. १४५१/- इतकी रक्कम देण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्हापरिषदेच्या मुख्य इमारतीचे टेरेस वॉटर प्रुफींग व पेंटीगची कामे नियमबाह्य रितीने सीएसआर दरावर दिल्याबाबत

**(२८) * १२३२३७ श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हापरिषदेच्या बांधकाम विभागाद्वारे गोंदिया जिल्हापरिषदेच्या मुख्य इमारतीचे टेरेस वॉटर प्रुफींगचे १८ लाख रुपये लागत असलेली कामे एक-एक लाख रुपयांचे विभाजन करुन देण्यात आले असून मुख्य इमारतीच्या पेंटीगचे १५ लाख रुपये लागत असलेले काम तीन-तीन लाख रुपयांचे विभाजन करुन देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकाच इमारतीचे टेरेस वॉटर प्रूफींगचे काम १८ वेगवेगळया कंत्राटदारांना विभाजन करुन ई टेंडरींग न करता सीएसआर दरावर देणे व एकाच इमारतीच्या चार बाजूची कामे तीन-तीन लाख रुपयांचे विभाजन करुन ई टेंडरींग न करता वेगवेगळया कंत्राटदारांना सीएसआर दरावर देणे नियमबाह्य आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार नियमबाह्य रितीने कामे वाटप करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी सविस्तर चौकशी सुरु आहे.

-----------------

## औरंगाबाद येथील शासकीय घाटी रुग्णालयातील बालरोग विभागात आठ बालकांचा झालेला मृत्यू

**(२९) * ११७५५९ श्री.विजय औटी (पारनेर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील शासकीय घाटी रुग्णालयातील बालरोग विभागात ३२ तासांमध्ये ८ बालकांचा मृत्यू झाल्याची बाब दिनांक २२ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयामध्ये सलाईन, आरएल, एनएस सलाईन्स, पॅरासिटामोलसारखे प्राथमिक औषधे आणि अॅन्टीरेबीज व्हॅक्सिन (एआरव्ही), मेट फारमिन, आयसो सरबाईट या महत्वांच्या औषधांसह कफ सिरप रुग्णालयात माहे जानेवारी, २०१८ पासून उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बालकांच्या मृत्यूची चौकशी शासनाने केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार या बालकांच्या मृत्युची कारणे काय आहेत व त्यानुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, खरे आहे.

(२) नाही.

(३) होय.

(४) मृत्यू झालेला प्रत्येक बालक वेगवेगळ्या आजाराने ग्रस्त होता व प्रत्येकाच्या मृत्यूचे कारण वेगवेगळे होते.

हे सर्व रूग्ण इतर दवाखान्यात जन्मलेले असुन त्याठिकाणी त्यांच्यावर काही उपचार झाल्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना घाटी रूग्णालयात दाखल करण्यात आले होते.

मृत्यू झालेल्या आठ (८) बालकांपैकी सहा (६) नवजात अर्भक होती, तसेच ती इतर दवाखान्यात जन्म झालेली, १५०० ग्राम पेक्षाही कमी वजनाची, अन्यवस्थ, अत्यंत गंभीर व जीवाणू संक्रमित परिस्थितीत दाखल झाली होती. इतर २ बालके न्युमोनिया या गंभीर आजाराने ग्रस्त होती.

८ बालकांपैकी ३ बालकाना या रूग्णालयात अत्यंत अत्यवस्थ व गंभीर परिस्थित दाखल करण्यात आले होते. आवश्यक ते सर्व उपचारानंतर सुद्धा ते २४ तासाच्या आत दगावले.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिन्नर (जि.नाशिक) ग्रामीण रुग्णालय आवश्यक यंत्रसामुग्री व साधन सामुग्रीसह सुरु करण्याबाबत

**(३०) * १२३११३ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर (जि. नाशिक) ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण झाले असून अद्यापपर्यंत वैद्यकीय उपकरणे व साहित्य सामुग्री याचा पुरवठा न झाल्याने रुग्णालय सुरु झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिन्नर ग्रामीण रुग्णालयास आवश्यक वैद्यकीय उपकरणे व साहित्य सामुग्री उपलब्ध करून रुग्णालय तात्काळ सुरु करण्याची मागणी दिनांक २० मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने सिन्नर ग्रामीण रुग्णालय आवश्यक वैद्यकीय उपकरणे व साहित्य सामुग्रीसह सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय, सिन्नर चे बांधकाम अंतिम टप्प्यात आहे. रंगकाम, विद्युत जोडणी व नळ जोडणी ही कामे प्रलंबित असल्याने, सार्वजनिक बांधकाम विभागाने अद्याप इमारत हस्तांतरीत केलेली नाही.

(२) हे खरे आहे.

(३) नवनिर्मित आरोग्य संस्थांकरीता आवश्यक ती यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदी करण्याची प्रक्रिया सुरू करण्यासाठी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौ.बिजूर, रामतिर्थ आणि सावळी (ता.बिलोली, जि.नांदेड) येथील वन विभागाच्या जमिनीवर निसर्ग वन पर्यटन केंद्र उभारण्याबाबत

**(३१) * १२०२५५ श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.बिजूर, रामतिर्थ आणि सावळी (ता.बिलोली, जि.नांदेड) येथील वन विभागाच्या जमिनीवर निसर्ग वन पर्यटन केंद्र उभारण्याबाबतचा प्रस्ताव शासनाने दिनांक ९ एप्रिल, २०१८ रोजीच्या पत्रान्वये मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) औरंगाबाद यांच्याकडून मागविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे काय व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) शासनास प्रस्ताव अप्राप्त आहे. प्रस्ताव प्राप्त होताच यथोचित कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## कर्जत (जि.रायगड) उपजिल्हा रुग्णालयाची झालेली दुरवस्था

**(३२) * १२००३७ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील गरजू रूग्णांना आरोग्य सेवा मिळावी यासाठी शासनाने उपजिल्हा रूग्णालय बांधले असून या रुग्णालयाची दुरवस्था झाली असल्याने उपचारार्थ येणाऱ्या रूग्णांची आवश्यक उपचाराअभावी गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,५० खाटांचे असलेल्या या रुग्णालयात ताप, थंडी व किरकोळ आजार या व्यतिरिक्त कोणतेच उपचार मिळत नसल्याने रुग्णांना कल्याण,

उल्हासनगर, मुंबई, नवी मुंबई येथील रुग्णालयात उपचारार्थ पाठविण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रूग्णालयातील रिक्त पदे, औषधांची कमतरता व डॉक्टर, अधिकारी व कर्मचारी यांचे गैरवर्तनाचा त्रास रुग्णांना होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

रुग्णालयात एकुण मंजुर पदे-४७ आहेत. त्यामधील एकुण ४२ पदे भरलेली आहेत. वैद्यकीय अधिक्षक व वैद्यकीय अधिकारी यांच्या ९ पदापैकी ७ पदे भरलेली आहेत. उप जिल्हा रुग्णालय कर्जत, जि.रायगड येथे पुरेशा प्रमाणात औषधाचा साठा उपलब्ध आहे. रुग्णालयामधील वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत उपचारासाठी येणा-या रुग्णांची तपासणी करुन योग्य तो औषधोपचार करण्यात येतो.सन २०१७-१८ मध्ये बाहयरुग्ण-७६९०९, आंतररुग्ण ४३९६, प्रसुती-३९६, लहान शस्त्रकिया-४८९, मोठया शस्त्रकिया-७६, न्याय वैद्यक रुग्ण-११०६,शवविच्छेदन-८७, श्वानदंश-१०५०, सर्पदंश-१६३, विंचूदंश-३४५, क्ष-किरण चाचण्या-८६० व प्रयोगशाळा चाचण्या-३५७९८ यास्वरुपाच्या उपचारात्मक सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर व पुणे प्रादेशिक मनोरुग्णालयात मनोरुग्णांचे झालेले मृत्यू

**(३३) * ११७२०० डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रादेशिक मनोरुग्णालय,नागपूर येथे माहे मे, २०१८ मध्ये ४ रुग्णांचा मृत्यू झाला असून आतापर्यंत मागील एक वर्षात एकूण १७ रुग्णांचा मृत्यु झाल्याची बाब निदर्शनास आली आहे,हे खरे आहे काय,

(२) तसेच पुणे येरवडा येथील प्रादेशिक मनोरुग्णालयात मागील चार महिन्यांत ३० रुग्णांचा प्रभावी वैद्यकीय उपचाराअभावी व रुग्णालयाच्या दुर्लक्षामुळे मृत्यु झाल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अस्वच्छता व गंभीर आजार असलेल्या रुग्णांना झालेल्या जखमांमधून जंतुसंसर्ग होवून वैद्यकीय असुविधांमुळे मागील दोन वर्षात पुणे येरवडा येथील प्रादेशिक मनोरुग्णालयात १३९ रुग्णांचा मृत्यु झाला असून वैद्यकीय सुविधा अभावी मृत्यु पावलेल्या मनोरुग्णांची पोलीस स्टेशनात आकस्मीत मृत्यु म्हणून नोंद करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मृत मनोरुग्ण पत्त्यावर राहत नसल्याचे दाखवून मृतदेह खाजगी रुग्णालयांना सूपूर्द करण्याबाबतचे रॅकेट कार्यरत असल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर येथे मागील एक वर्षात २२ रुग्णांचा मृत्यु झालेला आहे.

(२) अंशत: खरे आहे.

येरवडा येथील मनोरूग्णालयात जानेवारी २०१८ ते एप्रिल २०१८ या कालावधीत एकूण ३३ रूग्णांचा मृत्यू झाला असून सदर मृत्यू उपचाराअभावी रूग्णालयाच्या दुर्लक्षतेमुळे झालेले नाहीत. मृत्यू झालेल्या सर्व रूग्णांना वेळोवेळी योग्य ते उपचार व संदर्भ सेवा दिलेली होती.

(३) सदर मनोरूग्णालयात मागील दोन वर्षात १३९ रूग्णांचा मृत्यू झाला आहे परंतु सदर रूग्णांचा मृत्यू हा अस्वच्छता व जखमातून जंतूसंसर्ग होऊन वैद्यकीय असुविधेमुळे झालेला नाही. जानेवारी, २०१७ पासून मृत्यू पावलेल्या

रूग्णांच्या मृत्यूच्या कारणासह पोलीस स्टेशनला नोंद करून medico legal case post-mortem केले जाते.

(४) हे खरे नाही.

मनोरूग्णाचा मृत्यू झाल्यास दावा न केलेले मृतदेह वैद्यकीय महाविद्यालयास वैद्यकीय शिक्षणासाठी मृतदेह सुपूर्द करण्यात येत होते. तथापि, जानेवारी २०१७ नंतर असे मृतदेह वैद्यकीय महाविद्यलयास देण्यात आलेले नाहीत.

(५) दि. १६ मे, २०१७ च्या शासन निर्णयानुसार मा.जिल्हा न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यागत समिती गठीत करण्यात आली असून मनोरूग्णालयामध्ये भरती असणाऱ्या आंतररूग्णांच्या मृत्यूबाबत समितीच्या बैठकीत परिक्षण करून आढावा घेण्यात येतो.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयातील जळीत कक्षात सुविधा उपलब्ध नसल्याने झालेले मृत्यु

**(३४) * ११८५१२ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयात जळालेल्या रूग्णांवर प्रभावी उपचारासाठी जळीत कक्षात पुरेश्या सोयीसुविधा उपलब्ध नसल्याने गेल्या वर्षात ९४ रूग्णांचा मृत्यु झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रूग्णालयामधील जळीत कक्ष अद्ययावत करण्याकरीता सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण विभागाने सन २०१७ मध्ये "नॅशनल प्रोगाम ऑफ बर्न इन्जुरिज" या प्रकल्पास मंजुरी दिली असुन त्याकरीता ३.१४ कोटी रूपयाची तरतुद करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पाकरीता केंद्रशासनाचे ६० टक्के व राज्यशासनाचे ४० टक्के अनुदान देणार असुन त्या कराराला वर्षे होऊनही केंद्र व राज्य शासनाची मंजुरी मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या जळीत कक्षाला अद्ययावत करण्याकरीता मंजुर झालेला ३.१४ कोटी रूपयाच्या निधीला तात्काळ मंजुरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे. रू.३.११४ कोटीची तरतूद ही तीन वर्षाकरिता कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी आहे.
(३) सामंजस्य करार केंद्र शासनास सादर करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.
(४) केंद्र शासनाच्या मानकांनुसार प्रस्ताव तपासून मंजूरी देण्याची कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्रादेशिक मनोरुग्णालयांमधील रिक्त पदांबाबत

**(३५) * १२१३८४ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पुणे, ठाणे, नागपूर व रत्नागिरी येथील चारही प्रादेशिक मनोरुग्णालयांमध्ये २१९६ मंजूर पदे असून सुमारे ५७३ पदे रिक्त असल्याची बाब दिनांक २९ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चार प्रादेशिक मनोरुग्णालयांपैकी रत्नागिरी वगळता अन्य तीन ठिकाणी हंगामी डॉक्टरांकडून रुग्णालये कार्यान्वीत ठेवण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मानसिक आजारावरील उपचारासाठी अर्थसंकल्पात ६ कोटी १४ लाख रुपये एवढी आर्थिक तरतूद असताना प्रत्यक्षात खर्च केवळ १ कोटी ४० लाख रुपये झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची चौकशी करुन या चार प्रादेशिक मनोरुग्णालयातील रिक्त पदे भरण्यासह अर्थसंकल्पीय तरतुदीची रक्कम आवश्यक बाबींवर खर्च करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय.
(२) नाही.
(३) सन २०१७-१८ मध्ये उपलब्ध लेखाशिर्षामध्ये ६ कोटी ११ लाख ९८ हजार इतका निधी मंजूर असून त्यापैकी मानसिक आजारावरील उपचारासाठी औषधांकरीता ३ कोटी ११ लाख ३३ हजार १४१ इतके अनुदान होते. त्यापैकी ३ कोटी ७ लाख ४३ हजार ७९३ इतका खर्च झालेला आहे.
(४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून गट अ व ब संवर्गातील पदभरतीची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. तसेच गट -क व गट-ड या पदांच्या पद भरतीची कार्यवाही उपसंचालक व वैद्यकीय अधिक्षक प्रादेशिक मनोरुग्णालय स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर व भंडारा येथील एम.डब्लु.एस.आय.पी. च्या कालवे दुरुस्तीच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(३६) * १२००८५ श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अधिक्षक अभियंता व प्रशासक लाभ क्षेत्र विकास प्राधिकरण, नागपुर अंतर्गत कार्यकारी अभियंता भंडारा पाटबंधारे विभागाद्वारे पेंचप्रकल्पाच्या व गोसेखुर्द प्रकल्पाच्या कालव्यावर कालवे दुरुस्ती, लाईनिंगचे कामे, मुरूमाची कामे, कॉंक्रिटची कामे तसेच रीशेक्सनिंगची कोट्यवधीची कामे व लघुपाटबंधारे विभाग, नागपुर (नागपुर पाटबंधारे विभाग, (दक्षिण) नागपुर) व पेंच पाटबंधारे विभाग, नागपुर (भु व जल व्यवस्थापन पथदर्शी प्रकल्प, नागपुर) अंतर्गत सन २००८ ते २०१४ च्या आर्थिक वर्षात एम.डब्लु.एस.

आय.पी वर्ल्ड बँकेच्या निधीतून सुमारे ३२५ कोटी रूपयाचे व विशेष दुरूस्ती नविनीकरण कामासाठी सुमारे ८० कोटी रूपयाची कालवे दुरूस्ती, लाईनिंगचे कामे, मुरूमाची कामे, कॉँक्रिटची कामे तसेच रीशेक्सनिंगची कामे कंत्राटदार एजन्सीमार्फत करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामामध्ये माहिती अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त माहितीच्या आधारे खोटे एम.बी. देयके तयार करणे, कामे न करताच देयके घेवून गैरव्यवहार करणाऱ्या अधिकारी, कंत्राटदाराविरूद्ध अधिक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नागपुर यांना गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत दिनांक २७ ऑक्टोबर, २०१४ व दिनांक २९ मे,२०१५ तसेच मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी लोकप्रतिनिधींनी तक्रार दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच अधिक्षक अभियंता व परीमंडळ अधिकारी दक्षता पथक (नागपुर परीमंडळ) जलसंपदा विभाग, नागपुर यांना दिनांक ७ व २७ जून,२०१६, दिनांक २३ नोव्हेंबर, २०१६ व दिनांक १४ डिसेंबर, २०१६ रोजी वारंवार तक्रार देवूनही प्रकरणाची चौकशी वा कारवाई अद्यापर्यंत न करणे, चौकशी प्रलंबित असणे याबाबत दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी मा.मुख्यमंत्री यांना लोकप्रतिनिधीनी तक्रार दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाचे कार्यासन अधिकारी, जलसंपदा विभाग यांचे पत्र क्र.२०१८/(२९/०११८)/दक्षता-३ दि.०१/०२/२०१८ रोजी अधीक्षक अभियंता दक्षता पथक नागपूर यांना चौकशीचे निर्देश देण्यात आले त्यानुसार प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशी अहवाल शासनास सादर करण्यात आला वा करण्यात येत आहे व त्यानुसार दोषी अधिकारी व कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) व (३) होय.

(४) दक्षता पथक परिमंडळ, नागपूर यांचे मार्फत चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे देवभाने-सायने व मौजे बाळापूर ते वरखेडी (ता.जि.धुळे) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(३७) * ११७९६२ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे देवभाने-सायने (ता.जि.धुळे) या रस्त्याची दुरवस्था झाली असून रस्त्यावर ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने प्रवासी वाहतूकदारांना व नागरीकांना प्रवास करणे गैरसोयीचे झाले असल्याचे माहे मे, २०१८ वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच मौजे बाळापूर ते वरखेडी (ता.जि.धुळे) या रस्त्याची दुरवस्था झाल्याने नागरिकांची व शेतक-यांना गैरसोय होत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार मौजे देवभाने-सायने व मौजे बाळापूर ते वरखेडी या दोन्ही रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) अंशत: हे खरे आहे.

(३) जिल्हा परिषदेमार्फत सदर रस्त्याची पाहणी करण्यात आली आहे.

(४) प्रश्नांकित देवभाने ते सायने हा इतर जिल्हा मार्ग क्र. ६४ चा भाग रस्ता असून या भाग रस्त्याची लांबी ४.४० कि.मी. आहे. त्यापैकी सा.क्र. ०/०० ते १/३०० व ३/८०० ते ४/२०० ही लांबी सुस्थितीत आहे. उर्वरीत सा.क्र. ४/२०० ते ४/४०० कि.मी. लांबी खडी पृष्ठभागाची आहे. या रस्त्याच्या खराब लांबीतील रस्ता दुरुस्तीचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार जिल्हा वार्षिक योजनेमध्ये प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

तसेच बाळापूर ते वरखेडी हा इतर जिल्हा मार्ग क्र. १९ चा भाग रस्ता असून या भाग रस्त्याची लांबी १.०० कि.मी. आहे. या १.०० कि.मी. लांबीच्या रस्त्याच्या नुतनीकरणाचे काम विशेष दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत मंजूर असून निविदा स्तरावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे येथील ससून रुग्णालयाच्या नवीन इमारतीचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(३८) * १२३९७९ श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील ससून रुग्णालयाच्या नवीन इमारतीचे ९ वर्षापासून सुरु असलेले काम पूर्ण झाले नसल्याचे दिनांक ६ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रलंबित असलेली निविदा प्रक्रिया राबवून तात्काळ या इमारतीचे काम, फर्निचरची व्यवस्था व इतर कामे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर इमारत रुग्णसेवेच्यादृष्टीने वापरात येण्याकरीता अंतर्गत सुविधा निर्माण करण्यासाठी तेथील विद्युत कामे प्रगतीपथावर असून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत स्थापत्य कामांची निविदा स्विकृती प्रक्रियाबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात जंगलांना लागत असलेल्या वणव्याने वनराई नष्ट होत असल्याबाबत

**(३९) * ११७०६७ श्री.छगन भुजबळ (येवला), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल),**

**श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय कदम (दापोली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सातत्याने जंगलांना लागत असलेल्या वणव्यामुळे शेकडो एकर जंगल जळून नष्ट झाले असून माहे मार्च, २०१८ पासून राज्यात वणव्यांच्या दिड हजार घटनांची नोंद झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जंगल परिसरात शासनाने लोकसहभागातून मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड

करून यासाठी लाखो रूपये खर्च करून योजना राबविल्या जात असताना जंगलाना लागणाऱ्या वणव्यांमुळे सदर वृक्ष जळून नष्ट होण्याचे प्रकारात वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बोरिवली (मुंबई) येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील जंगलात माहे मार्च, २०१८ मध्ये दोन वेळा आग लागली असून नाशिक जिल्ह्यातील पिनाकेश्वर (ता.नांदगाव) डोंगर व अनकाई (ता.येवला) किल्यावर माहे एप्रिल २०१८ मध्ये लागलेल्या आगीमुळे शेकडो एकरावरील वनसंपदा खाक झाली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुरबाड (जि.ठाणे) येथे जंगलांना वणवे लागल्याच्या घटना वारंवार घडत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये निदर्शनास आले असून या वणव्यांमुळे रानमेव्यांवर परिणाम होऊन मुरबाड सहयाद्रीच्या पट्टयातील यावर उपजिविका असलेल्या आदिवासी बांधवांचे नुकसान होत आहे, तसेच रायगड जिल्ह्यातील जंगलात वणवे लागण्याच्या प्रकारात वाढ होत असून रोहा (जि.रायगड) तालुक्यात माहे मे, २०१८ पर्यंत पाच वेळा जंगलांना वणवे लागून शेकडो एकर जंगल जळून नष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, जंगलांना लागत असलेल्या वणव्यांमुळे वनराई नष्ट होवू नये व आदिवासींची उपजिविका असलेला रानमेवा जपण्यासाठी सदरील वणवे रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे.
(२) सदर आगीच्या घटना हया जमिनीवर च्या स्वरुपात असून आगीच्या घटनामुळे वृक्ष जळून नष्ट झालेले नाही. केवळ पालापाचोळा व गवत जळालेला आहे.
(३) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात दिनांक १२.३.२०१८ व दिनांक १३.३.२०१८ असे दोन वेळा आग लागल्याची घटना निदर्शनास आली असून एका आरोपी विरुध्द वनगुन्हा जारी केला आहे.

तसेच पुर्व नाशिक वन विभागातील नांदगाव वनपरिक्षेत्रात दिनांक १८.४.२०१८ रोजी चंदनपुरी, पिनाकेश्वर मंदिर परिसरालगतच्या जंगलाला आग लागून ४.४६ हेक्टर क्षेत्रावरील व दिनांक १९.४.२०१८ रोजी चंदनापुरी या परिसरात आग लागून ४.०७ हेक्टर क्षेत्रावरील गवत व पालापाचोळा जळून नुकसान झालेले आहे. याबाबत प्रथम गुन्हा रिपोर्ट जारी केले आहेत. अनकाई ता.येवला किल्ल्यावर आग लागल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(४) ठाणे वनवृत्तातील मुरबाड तालुक्यातील मुरबाड पूर्व, मुरबाड पश्चिम, टोकवडे (दक्षिण), टोकवडे (उत्तर) या वनपरिक्षेत्रामध्ये माहे एप्रिल २०१८ मध्ये वनवणव्याच्या ४० घटना घडलेल्या आहेत. तसेच रायगड जिल्हयातील रोहा तालुक्यात माहे जानेवारी २०१८ ते मे २०१८ पर्यत २६ आगीच्या घटना घडलेल्या आहेत.

सदर वणवे हे जमिनीलगतच्या आग या प्रकारातील  असून त्यामध्ये वाळलेला पालपाचोळा व गवत जळालेला आहे. वनव्यामुळे रानमेव्यावर परिणाम झाल्याचे निर्दशनास आलेले नाही.

(५) वनक्षेत्रात वनवणवा लागु नये म्हणुन खालील प्रमाणे प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येतात.

१. वनवणवा नियंत्रणासाठी नियमित अंतर्गत व बाहय जाळरेषा घेण्यात येतात.

२. १५ फेब्रुवारी ते १५ जून या कालावधीसाठी आगीवर नियंत्रण ठेवण्यासाठी फायर वॉचर नेमण्यात आलेले आहेत.

३. वनअधिकारी व वन कर्मचारी यांचे मार्फत नियमित गस्त करण्यात येते.

४. वनवणवा नियंत्रणासाठी क्षेत्रीय कर्मचा-यांना (Fire Fighting Equipment) वनवणवा साधन सामुग्री पुरविण्यात आलेली आहे.

५. परिमाणकारक गस्त घालणे सोयीस्कर व्हावे म्हणून सर्व वनक्षेत्रपाल यांना वाहने पुरविण्यात आलेली आहेत.

६. वनाच्या एखादया भागात आग लागलीच तर त्याची त्वरित दखल घेण्याकरिता त्या दरम्यान स्थानिक ग्रामस्थांची मदत घेऊन तसेच रोजंदारी हंगामी मजूरांच्या सहाय्याने आगीवर नियंत्रण करण्यासाठी वनवणवा हंगामात हंगामी मजूर नेमले जातात.

७. जंगलात लागलेल्या आगीवर तात्काळ नियंत्रण करण्यासाठी जवळपासचे फायर वॉचर, क्षेत्रीय कर्मचारी व ग्रामपरिस्थितीकीय विकास समितीचे मदतीची मदत घेण्यात येते.

८. ग्राम परिसरातील लोकांना आगीबाबत माहिती व मार्गदर्शन करुन जनजागृती केली जाते.

९. वनात आग लावणा-या गुन्हेगारावर भारतीय वन अधिनियम १९२७ व वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अंतर्गत संबंधित गुन्हेगारावर कारवाई करण्यात येते.

१०. वनविभागाने संगणकीकरण करण्यासाठी क्षेत्रिय कर्मचा-यांना PDA स्मार्ट फोन वितरण केलेले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हा परिषदेने निकृष्ट दर्जाच्या सौर पथ दिव्यांची खरेदी केल्याबाबत

**(४०) * १२३८४६ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील नियोजन समीतीने सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात सौर पथ दिव्यासाठी तीन कोटी रूपयांचा निधी जिल्हा परिषद, पुणे यांना उपलब्ध करून दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निधीच्या माध्यमातुन १८०० दिव्याची खरेदी करण्यात आली परंतु पुरवठा करण्यात आलेले सौर दिवे निकृष्ट दर्जाचे असल्याने एक ते दोन महिन्यातच ते बंद पडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषद, पुणे यांनी काळ्या यादीत टाकलेल्या कंपनी कडूनच या पथ दिव्याची खरेदी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार निकृष्ट दर्जाच्या सौर पथ दिव्याचा पुरवठा करणाऱ्या कंपनीकडून तीन कोटी वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) नाही.

सदर निधीतून १९६५ सौर पथदिवे खरेदी करण्यात आले होते.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कडाचीवाडी (ता.खेड, जि.पुणे) येथील वनविभागाच्या जंगलात मोर व लांडोरची शिकारीसह सागाच्या वृक्षांची तोड केल्याबाबत

**(४१) * १२०१५१ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कडाचीवाडी (ता.खेड,जि.पुणे) येथील सुकला डोंगर भागातील वनविभागाच्या जंगलात राष्ट्रीय पक्षी मोर व लांडोर यांची शिकार झाल्याची बाब दिनांक १५ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन विभागाच्या हद्दीतील सागाची झाडेही मोठ्या प्रमाणात तोडून नेल्याचेही आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार मोर व लांडोर यांची शिकार करणाऱ्या व सागाच्या झाडांची तोड करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

दिनांक १५ मे, २०१८ रोजी व त्या दरम्यान कडाचीवाडी (ता.खेड, जि.पुणे) येथील सुकला डोंगर भागातील जंगलात मोर व लांडोर यांची शिकार झाल्याची घटना निदर्शनास आलेली नाही.

(२) हे खरे नाही.

वन विभागाच्या हद्दीतील सागाची झाडे मोठया प्रमाणात तोडून नेल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विक्रमगड (जि.पालघर) येथील आदिवासींना मंजुर असलेली घरकुल योजनेतील घरे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४२) * ११९९७७ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अमित घोडा (पालघर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुनिल केदार (सावनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) येथील आदिवासींना सन २०१५ सालापासून मंजुर असलेली घरकुल योजनेतील घरे अद्यापही अपूर्णावस्थेत असल्याचे माहे मे, २०१८ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१५-१६ मध्ये मंजुर झालेल्या घरकुलांपैकी १८८ घरकुले आणि सन २०१६-१७ मध्ये मंजुर झालेल्या घरकुलांपैकी ६६६ घरकुले अपुर्णावस्थेत आहेत तसेच सन २०१७-१८ मध्ये मंजुर झालेल्या ३१० घरकुलांपैकी एकाही घरकुलाचे काम अद्याप सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व सदरहू अपूर्णावस्थेतील घरकूले तातडीने पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यामध्ये सन २०१५-१६ मध्ये इंदिरा आवास योजने अंतर्गत २१७२ मंजूर घरकुलांपैकी २०८६ घरकुले पूर्ण करण्यात आले, सन २०१६-१७ या वर्षामध्ये ८३६ मंजूर घरकुलांपैकी ४६८ घरकुले पूर्ण करण्यात आले व सन २०१७-१८ या वर्षामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ३१० मंजूर घरकुलापैकी १६० घरकुले पूर्ण करण्यात आलेली आहेत. उर्वरित सर्व अपूर्ण घरकुलांचे बांधकामे प्रगतीपथावर असून अपूर्ण घरकुलांसबंधी सर्व संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या बैठका आयोजित करुन घरकुलांचे कामे पूर्ण करण्याबाबत निदेश देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डोणगाव (ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथे नदीवर बांधलेल्या साखळी बंधाऱ्याचे काम कंत्राटदाराने निष्कृट दर्जाचे केल्याबाबत

**(४३) * ११९४२२ श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.नसीम खान (चांदिवली), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोणगाव (ता.मेहकर,जि.बुलढाणा) येथे दोन वर्षापूर्वी नदीवर बांधलेल्या साखळी बंधाऱ्याचे काम कंत्राटदाराने निष्कृट दर्जाचे केल्याने बंधारा दोनदा फुटून तेथील शेतक-यांच्या शेतात पाणी जाऊन शेतीचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधाऱ्याचे शासनाने पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार सदर बंधा-याची तात्काळ दुरुस्ती करुन या बंधाऱ्यांचे काम निकृष्ट दर्जाचे करणा-या कंत्राटदारावर कारवाई करण्यासह नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही. तथापि, सन २०१५-१६ यावर्षी बांधलेल्या बंधाऱ्याची एका बाजूची माती अतिपर्जन्यमानामुळे नदीला आलेल्या पुरामुळे वाहून गेली होती.
(२) व (३) होय. सदर बंधाऱ्याची पाहणी वरीष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, बुलढाणा या कार्यालयामार्फत करण्यात आली असून पाहणी दरम्यान बंधारा सुस्थितीत असून बंधाऱ्याच्या एका बाजूची माती वाहून जात असल्याचे निदर्शनास आले. व त्यानूसार वरीष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, बुलढाणा यांचेमार्फत कंत्राटदारास सुचना देण्यात आल्या. त्यानूसार कंत्राटदाराने सदर बंधाऱ्याच्या वाहून गेलेल्या भागात माती व दगडी पिचिंग करून दुरूस्ती करून दिलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिमोफिलियाग्रस्त रुग्णांना आवश्यक असलेली औषधे उपलब्ध होत नसल्याबाबत

**(४४) * ११८१२६ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या आरोग्य विभागाकडून हिमोफिलियाच्या रुग्णांना मोफत औषधे देण्यात येत असून गेल्या वर्षभरापासून हिमोफिलियाच्या रुग्णांना आवश्यक असलेली औषधे उपलब्ध होत नसल्याने राज्यातील हजारो हिमोफेलीया बाधित रुग्णांना वेळेवर उपचार होत नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सातारा येथील आरोग्य विभागाच्या केंद्रामधील हिमोफिलीया या आजारावरील औषधांचा तुटवडा असून उपचारासाठी रुग्णांना मुंबईला यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आजारावरील औषधांची खरेदी हाफकिन संस्थेकडून होणे अपेक्षित असतानादेखील त्यांनी या औषध खरेदीची निविदा रद्द केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्याअनुषंगाने हिमोफिलीयाग्रस्त रुग्णांना तातडीने औषध पुरवठा करण्यासह वेळेवर उपचार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

सदर औषध खरेदीची निविदा तांत्रिक कारणास्तव रद्द करण्यात आली.

(४) तांत्रिक कारणास्तव निविदा प्रक्रिया रद्द झाल्याने हिमोफिलियाग्रस्त रुग्णांना तातडीने औषध पुरवठा करणे शक्य व्हावे यासाठी आणीबाणी तत्वावर आवश्यक औषधसाठा केंद्र शासनाच्या ESIC च्या दरकरारानूसार खरेदी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भोकरंबा (ता.रेणापूर, जि.लातूर) येथील जिल्हा परिषद शाळेच्या जागेवर झालेले अतिक्रमण

**(४५) * १२१३४९ श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकरंबा (ता.रेणापूर, जि.लातूर) येथील जिल्हा परिषद शाळेच्या जागेवरील अतिक्रमण काढण्याबाबतची मागणी निवेदनाद्वारे स्थानिक लोकप्रतीनिधी, लातूर ग्रामीण यांनी जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे दिनांक ७ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अतिक्रमणाची योग्य ती चौकशी करून कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, लातूर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा

परिषद, लातूर यांना दिनांक ९ एप्रिल, २०१८ रोजीच्या पत्रान्वये आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार जिल्हा परिषद शाळेच्या जोगवरील अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) होय.

(४) व (५) भोकरंबा ता.रेणापूर जि.लातूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या जमीनीवर अतिक्रमण करून घर बांधण्यात आले असून सदर अतिक्रमण हटविण्यात येऊ नये म्हणून अतिक्रमणकर्तांनी मा.दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, लातूर येथे दावा क्र.२०४/२०१८ दाखल केले आहे. त्यामुळे सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

## आरेवाडी (ता.तासगावं, जि.सांगली) येथील 'विरोबा मंदिर' पर्यटन क्षेत्र होण्याबाबतचा प्रस्ताव

**(४६) * १२१०१२ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरेवाडी (ता.तासगांव, जि.सांगली) येथील धनगर समाजाचे आराध्य दैवत श्री विरोबा मंदिर हे पर्यटन क्षेत्र व्हावे याकरिता तालुक्यातील लोकप्रतिनिधींनी मा.पर्यटन मंत्री यांच्याकडे तीन वर्षापासून प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तीन वर्षापासून अधिक कालावधी होऊनसुध्दा याबाबत अद्यापी कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री विरोबा मंदिर पर्यटन क्षेत्र करुन विकसित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१)नाही. तथापि, विरोबा देवालय,आरेवाडी येथील भक्त निवास व स्वच्छतागृह इमारत बांधण्यासाठी उर्वरित निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी करण्यात आलेली होती. सदर कामासाठीचा उर्वरित निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(२) नाही.
(३) विरोबा देवालय,आरेवाडी येथे विकास कामांसाठी आतापर्यंत पर्यटन विभागाकडून रू.३१७.९९ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून सदर निधीमधून भक्तनिवास,स्वच्छतागृह,गेस्ट रुम,क्लोकरुम ही कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. तसेच ग्राम विकास विभागामार्फत दुकान गाळे(२४ गाळे), अंतर्गत रस्ता, वाहनतळ,पथदिवे अशी एकूण रू.९७.०५ लक्षची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत.

तसेच प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत पर्यटन विभाग,शासन निर्णय, दि.६/२/२०१८ अन्वये श्री विरोबा देवालय,आरेवाडी येथील कामांना रू.४० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. यामध्ये डॉर्मिटरी इमारत, अंतर्गत रस्ते,प्रदक्षिणा मार्ग(पेव्हर ब्लॉक),पथदिवे बसविणे,कंपाऊंड वॉल इत्यादी कामांचा समावेश आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर पाटबंधारे विभागांतर्गत नकोडा, घुग्घुस व चारगांव येथील शेतकऱ्यांना वर्धा नदीचे व कालव्याचे पाणी सिंचनासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४७) * १२२१०९ श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर पाटबंधारे विभागांतर्गत नकोडा, घुग्घुस व चारगांव येथील शेतकऱ्यांना वर्धा नदीचे व कालव्याचे पाणी सिंचनासाठी उपलब्ध करून न देता उद्योगांना देण्यात आल्याची तक्रार शेतकऱ्यांनी दिनांक १४ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास केल्याची निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चंद्रपूर पाटबंधारे विभागाचे संबंधित कार्यकारी अभियंता यांच्या गैरकारभारामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हयातील पालकमंत्री शेत/पाणंद रस्ते योजनेतंर्गत रस्त्यांची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(४८) * ११९२६३ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेतीपर्यंत जाण्यासाठी शेतीला बारमाही शेतरस्त्यांची आवश्यकता असल्याने शेत व पाणंद रस्त्यांची कामे एकत्रीत करण्याचा प्रस्तावास शासनाने मान्यता देऊन नवीन पालकमंत्री शेत / पाणंद रस्ते योजना सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पालकमंत्री शेत पांदण रस्ते योजनेतंर्गत मोताळा (जि.बुलढाणा) तालुका व जिल्हयात आतापर्यंत समाधानकारक काम झाले नसून अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार मोताळा (जि.बुलढाणा) व जिल्हयात प्रलंबित असलेली पालकमंत्री शेत पांदण रस्ते योजनेतंर्गतची कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे आहे.
(२) शासन निर्णय दिनांक २७ फेब्रुवारी,२०१८ अन्वये जिल्हयात पालकमंत्री शेत/पाणंद रस्ते योजना सुरु करण्यात आली असून सद्दस्थितीत ४१२ प्रस्ताव तालुकास्तरीय समितीसमोर सादर करण्यात आले आहेत. तसेच उर्वरित रस्त्यांच्या कामांचे कृती आराखडे तयार करण्याचे काम प्रगतीत आहे. बुलढाणा तालुक्यातील काही गावांमध्ये लोकसहभागातून ४० रस्त्यांची कामे पुर्ण करण्यात आली आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात कुपोषणामुळे बालकांच्या मृत्यूमध्ये झालेली वाढ

**(४९) * ११७०४८ श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय कदम (दापोली), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज**

**भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१७ मध्ये २३९ अर्भक व ३३२ बालके असे एकूण ५७१ बालकांचा कुपोषणाने मृत्यू झाला असून अमरावती जिल्ह्यातील मेळघाटासह

राज्यातील आदिवासी डोंगरी भागात माहे सप्टेंबर, २०१७ ते माहे जानेवारी, २०१८ या कालावधीत ३१८ बालकांचा कुपोषणाने मृत्यू झाला असल्याचे माहे मे २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्हयातील १५ तालुक्यात १९६, कर्जत तालुक्यात ५३ बालके, औरंगाबाद जिल्ह्यात १७ हजार बालके कुपोषित असून नाशिक जिल्हयामध्ये ४३ टक्के बालकांमध्ये कुपोषण आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी जिल्हयातील लहान बालके व गरोदर, स्तनदा मातांचे होणारे कुपोषण रोखण्यासाठी पोषण आहार व आरोग्याच्या सोई उपलब्ध करुन देण्यासाठी एमबीबीएस अथवा बीएएमएस अर्हता असलेले वैद्यकीय अधिकारी प्रकल्प संचालक म्हणून नियुक्त करण्याच्या संदर्भात मा.मुख्यमंत्री यांनी दिलेल्या निदेशानुसार आतापर्यंत आदिवासी भागात कोणकोणत्या ठिकाणी उक्त अधिकारी नियुक्त केले आहेत,

(४) असल्यास, राज्यात कुपोषणामुळे होणारे बालकांचे मृत्यू रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली व त्याचे स्वरुप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

सन २०१७ मध्ये १६ आदिवासी जिल्हयात २१६१ बालमृत्यू झाले असून, अमरावती जिल्हयातील मेळघाट भागात १३३ व मेळघाटसह १६ आदिवासी जिल्हयात माहे सप्टेंबर २०१७ ते जानेवारी २०१८ या कालावधीत ० ते ६ वर्ष वयोगटातील ९९५ बालमृत्यू झाले आहेत.

(२) एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत माहे डिसेंबर,२०१७ च्या मासिक प्रगती अहवालावरुन कुपोषणाबाबतची श्रेणीनिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.

| जिल्हा | एकूण वजन घेतलेली बालके | सर्वसाधारण | मध्यम कमी वजनाची बालके | तीव्र कमी वजनाची बालके |
|---|---|---|---|---|
| रायगड | १३८९०१ | १३१५६९ | ६४३८ | ८९४ |
| औरंगाबाद | २५७३६७ | २३६००५ | १७७८७ | ३५७५ |
| नाशिक | ३८६८६२ | ३४४४६३ | ३५७३६ | ६६६३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कर्जत-१ प्रकल्प | ६९८० | ६३२० | ५३२ | १२८ |
| कर्जत-२ प्रकल्प | ७८२६ | ७०६० | ६८८ | ७८ |

(३) बाल विकास प्रकल्प अधिकारी या पदाकरीता बीएएमएस अथवा व एमबीबीएस ही अर्हता निश्चित करण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार या पदाकरीता सेवाप्रवेश नियमामध्ये पात्रता /अर्हता ठरविण्यासाठी घेण्यात आलेल्या बैठकीत नामनिर्देशनाने भरावयाच्या बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण) गट ब या संवर्गातील पदांसाठीच्या शैक्षणिक अर्हतेममध्ये एमबीबीएस मधील वैद्यकीय पदवीधारक अथवा BA (Nutrition), BA (Home Science), BSC (Child Psychology) BA (Clinical Psychology) केवळ पदवीधारक किंवा पदव्युत्तर पदवी अशी शैक्षणिक अर्हता सुधारित सेवा प्रवेश नियमात करावी अशा सुचना दिल्या. त्याअनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाशी विचारविनिमय करुन सेवा प्रवेश नियमामध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) कुपोषणामुळेच बालमृत्यू होतात असे नाही तर बालमृत्यू हे विविध आजार व संसर्गजन्य आजार इत्यादिमुळे होतात. उदा.निमोनिया, दुर्धर आहार, तिव्र ताप, मलेरिया, गोवर, जुळे जन्म, अपु-या दिवसाची प्रसुती, जन्मत: कमी वजन, अतिसार, सिकलसेल, अस्थमा, श्वासावरोध, टि.बी., कावीळ, डेंगु, मलेरीया, मेंदुज्वर, रक्तक्षय (ॲनिमीया), धनुर्वात, डांग्याखोकला इत्यादि.

कुपोषण व बालमृत्यू रोखण्यासाठी शासनामार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडीतील ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालके, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता, तीव्र कमी वजनची बालके तसेच किशोरवयीन मुली यांना घरपोच आहार व ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थी यांना गरम ताजा आहाराचा पुरवठा स्थानिक स्वयंसहाय्यता महिला बचतगट/महिला मंडळ तसेच महिला संस्था यांचेमार्फत करण्यात येत आहे.

सदर योजने अंतर्गत सर्वसाधारण श्रेणीतील बालकांना दररोज ५०० उष्मांक आणि १२ ते १५ ग्रॅम प्रथिने असलेला आहार देण्यात येतो. त्याचप्रमाणे तीव्र कमी वजनाच्या बालकांना दररोज ८०० उष्मांक आणि २० ते २५ ग्रॅम प्रथिने असलेला आहार देण्यात येतो. नवसंजीवन क्षेत्रातील बालकांना प्रतिदिन प्रति लाभार्थी ९५० कॅलरी व २३ ते २८ ग्रॅम असलेला आहार पुरविण्यात येतो. याप्रमाणे अंगणवाडीतील लाभार्थ्यांना पोषण आहारातुन आवश्यक ते प्रथिने व कॅलरी देण्यात येतात.

अनुसूचित क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत अंगणवाडीमध्ये गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एकवेळचा चौरस आहार देण्यासाठी आदिवासी विकास विभागाच्या दि१८ व ३० नोव्हेंबर,२०१५ च्या शासन निर्णयान्वये भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यानुषंगाने सदर योजनेची अंमलबजावणी दिनांक १ डिसेंबर,२०१५ पासून करण्यात येत आहे. सदर योजनांच्या माध्यमातून कुपोषणांचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

ग्रामीण, नागरी व आदिवासी क्षेत्रातील कुपोषणावर प्रभावीपणे मात करण्याकरीता ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) योजना सुरु करण्यात आली आहे.

आरोग्य विभागामार्फत संस्थात्मक प्रसुती, नियमित लसीकरण, नवजात काळजी कक्ष, नवजात स्थिरीकरण कक्ष, विशेष नवजात काळजी कक्ष, एचबीएनसी व इन्टेनसिफाईड एचबीएनसी, जीवनसत्व अ व जंतनाशक मोहिम, बाल उपचार केंद्र, पोषण पुनर्वसन केंद्र, मानव विकास कार्यक्रमांतर्गत तज्ञांमार्फत मातांची व बालकांची तपासणी व उपचार नवसंजीवनी कार्यक्रमांतर्गत मातृत्व अनुदान योजना, भरारी पथकांमार्फत आरोग्य तपासणी व उपचार, दायी बैठक योजना इत्यादि उपाययोजना राबविण्यात येतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शेडसई (ता.रोहा, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील विकास कामांसाठी मिळालेल्या निधीचा केलेला अपहार

**(५०) * ११६७३३ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेडसई (ता.रोहा, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीत प्रत्यक्षात कामे न करता ४ ग्रामसेवक व १३ कंत्राटदारांनी लाखो रूपयाचा निधी खर्च केल्याचे दर्शवून निधीचा अपहार केला असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेडसई ग्रामपंचायतमधील ग्रामनिधी, वित्त आयोगाचा निधी व इतर कामांमधील निधीमध्ये अपहार व अनियमिततेबाबत गटविकास अधिकारी, रोहा (ता.रोहा, जि.रायगड) यांनी तत्कालीन ग्रामसेवकांना व १३ कंत्राटदारांना कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा मागितला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रोहा तालुक्यातील गोफण येथील सामाजिक कार्यकर्ते यांनी संबंधित ग्रामसेवक व १३ कंत्राटदारानी विकासकामांच्या नावाखाली केलेल्या लाखो रूपये निधीच्या अपहाराबाबत लेखी पुरावे देऊनसुद्धा संबंधीत दोषींवर अद्यापपर्यंत कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित ग्रामसेवक व कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३), (४) व (५) तक्रार अर्जाच्या अनुषंगाने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रोहा यांनी विस्तार अधिकारी(पंचायत), यांचे मार्फत चौकशी केली असता चौकशीनुसार ग्रामपंचायत शेडसई येथे दि. २५.०२.२००१ ते सप्टेंबर २०१६ या कालावधीत अपहार झाल्याच्या तक्रारीत तथ्य आढळून आले नाही.

-----------------

## गद्दिकुंठा व रामंजापूर (ता.सिरोंचा, जि.गडचिरोली) येथे सिमेंट क्राँक्रिट रस्ता बांधकामात झालेला गैरव्यवहार

**(५१) * १२२५३० श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गद्दिकुंठा, रामंजापूर (ता.सिरोंचा, जि.गडचिरोली) येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण योजनेंतर्गत सन २०१७-१८ मध्ये सिमेंट क्राँक्रिट रस्ता बांधकामात गैरव्यवहार झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार दोषी कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे अंशतः खरे आहे.

गैरव्यवहार झालेला नाही. परंतु अनियमितता झाली असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) सदर काम ग्रामपंचायती मार्फत केलेले आहे. अनियमिततेबाबत गट विकास अधिकारी पंचायत समिती सिरोंचा यांचेवर कारवाईचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उल्हासनगर (जि.ठाणे) येथील मध्यवर्ती रुग्णालयातील सोयी सुविधांबाबत

**(५२) * १२२०७९ श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील मध्यवर्ती रुग्णालयात कर्जत, कसारा, अंबरनाथ, बदलापूर व ग्रामीण भागातील रुग्ण उपचारासाठी येत असून सदर रुग्णालयात आवश्यक वैद्यकीय अधिकारी नसणे, औषधांचा तुटवडा व तांत्रिक तपासणी यंत्रे बंद असणे इत्यादी कारणामुळे उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच,सदर रुग्णालयातील शवागारातील वातानुकूलिन यंत्रणा बंद असल्याने या परिसरातील नागरीकांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालय दुरुस्तीसाठी शासनाने मंजूर केलेला १ कोटी १९ लाख रुपयांचा निधी २ वर्षापासून प्राप्त झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे

मध्यवर्ती रुग्णालय उल्हासनगर जि.ठाणे रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी गट-अ ग्रेड पे रु.६६००/- संवर्गाची एकूण १६ पदे मंजूर असून ५ पदे भरलेली व ११ पदे रिक्त आहेत. तसेच सदर रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी गट-अ ग्रेड पे रु.५४००/- संवर्गाची एकूण २८ पदे मंजूर असून २७ पदे भरलेली व १ पद रिक्त आहे. सदर रुग्णालयात सद्य:स्थितीत पुरेसा औषध साठा उपलब्ध आहे. तसेच शासन निर्णय दि.२६.०७.२०१७ नुसार विभागास प्राप्त एकूण निधीच्या १० टक्के निधी स्थानिक स्तरावर आवश्यक औषधे व अनुषंगिक वस्तु खरेदीसाठी वर्ग केला आहे.

दि.१२.०६.२०१८ पासून बंद पडलेली सीटी स्कॅन मशिन दुरुस्तीबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच सदर रुग्णालयातील कार्यान्वित सोनोग्राफी मशिनद्वारे रुग्णांना सेवा देण्यात येत आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर रुग्णालयातील शितशवागार यंत्रणा दि.२३.०५.२०१८ व दि.२४.०५.२०१८ रोजी वातानुकुल यंत्रामध्ये बिघाड झाल्याने बंद होती. सदर यंत्र सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभागाकडून दि.२५.०५.२०१८ रोजी दुरुस्त करुन देण्यात आली आहेत.

(३) हे अंशत: खरे आहे.

सन २०१८-१९ मध्ये आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) शासन स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यात एचआयव्हीबाधित रुग्णांच्या संख्येत झालेली वाढ

**(५३) * १२२६७८ श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील पनवेल, उरण, खोपोली व महाड या औद्योगिक वसाहती असलेल्या शहरात रोजगारासाठी अन्य राज्यातून लोक येत असून येथील कामगारांसह नागरिकांची आरोग्य तपासणी केली असता जिल्ह्यातील ४६१ रुग्णांना एचआयव्ही पॉझिटिव्ह असल्याची बाब दिनांक ११ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, या एचआयव्ही बाधितांमध्ये १६ गर्भवती महिलांचाही समावेश असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने या जिल्ह्यातील एचआयव्ही नियंत्रणासाह एचआयव्ही बाधित गर्भवती महिलांच्या आरोग्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) एड्स नियंत्रण कार्यक्रमातंर्गत सर्व जिल्हयांतील एच.आय.व्ही. रुग्णांचा नियमितपणे आढावा घेतला जातो. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) • राष्ट्रीय एड्स कार्यक्रमातंर्गत पी.पी.टी.सी.टी. उपक्रमाद्‌वारे सर्व गर्भवती महिलांना एच.आय.व्ही. बाबत प्रसूतीपूर्व चाचणी विभागात सेवा पुरविल्या जातात त्यांचे

• त्यांचे समुपदेशन व रक्त तपासणी केली जाते. संसर्गित गरोदर मातांची बाळंतपणे रुग्णालयात केले जाते व पुढील उपचाराबाबत मार्गदर्शन केले जाते.

• संसर्गीत गर्भवती महिलांची नोंद घेण्यात येते व त्यांना उपचारासाठी एआरटी केंद्राक्रडे संदर्भीत करुन त्वरीत एआरटी उपचार सुरु केले जातात तसेच सदर उपचारात सातत्य व नियमितता राखण्याकरिता विशेष काळजी घेतली जाते व पाठपुरावा केला जातो.

• मातेकडून अर्भकास एच.आय.व्ही. संसर्गाचा धोका कमी करण्यासाठी ईआयडी कार्यक्रमांतर्गत एच.आय.व्ही. संसर्गित मातेच्या जन्मलेल्या बाळाची ६ आठवडे, ६ महिने, १२ महिने व १८ महिने या वयात एच.आय.व्ही. चे निदान करण्यासाठी तपासणी केली जाते.

• या तपासणीमध्ये आढळलेल्या एच.आय.व्ही. संक्रमित बालकांना एआरअी औषधोपचार सुरु केले जातात.

• सर्व गर्भवती महिलांकरिता नोंदणी, तपासणी व उपचार या सेवा सुविधा सर्व शासकिय दवाखान्यात मोफत दिल्या जातात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई येथील सेंट जॉर्ज रुग्णालयातील शवागाराची झालेली दुरवस्था

**(५४) * ११८८७१ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय**

**वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील सेंट जॉर्ज रुग्णालयाच्या शवागाराची दुरावस्था झाल्यामुळे मृतदेहांची अवहेलना होत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दुरवस्था झालेल्या शवागाराची पाहणी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदर शवागाराची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

सेंट जॉर्ज रुग्णालयातील शवागृहातील आवश्यक असलेले किरकोळ दुरस्तीची कामे करण्यात आलेली आहेत.

(२) सेंट जॉर्जेस रुग्णालयातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शाखेने शवागृहाची पाहणी केली आहे.

(३) शवागृहातील किरकोळ दुरुस्ती, रस्त्यांची डागडुजी व विद्युतीकरणाची कामे तातडीने करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दक्षिण आर्णी (जि.यवतमाळ) वनपरिक्षेत्रात होत असलेल्या सागवान तस्करीबाबत

**(५५) * ११९१६६ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण आर्णी (जि.यवतमाळ) वनपरिक्षेत्रात होत असलेल्या सागवान तस्करीबाबत चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी (आर्णी) यांनी दिनांक ३० जानेवारी, २०१८ रोजी मा.वने मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली असून या प्रकरणाची चौकशी करण्याबाबचे पत्र कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण), नागपूर यांना दिनांक १७ एप्रिल, २०१८ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच दिनांक २४ एप्रिल, २०१५ रोजी लिलावामध्ये सागवान विकत घेतला त्याच मालाची वनविभाग पांढरकवडा (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथे गैरव्यवहार झाला असून त्याची चौकशी करून संबंधित दोषींवर कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधी (आर्णी) यांनी दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी मा.वने मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, शासकीय कामात पदाचा गैरवापर करून शासकीय निधीचा गैरवापर केल्याबाबत व दैनंदिन शासकीय कामकाजात हस्तक्षेप केल्याने श्री.विपुल अमरसिंग राठोड (सहायक वनसंरक्षक, वनविभाग यवतमाळ) यांना निलंबित करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (आर्णी) यांनी दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी मा.वने मंत्री यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीनुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) दिनांक १८.१२.२०१७ रोजी निवेदन दिले हे खरे नाही. तथापि, दिनांक ३०.१.२०१८ रोजीच्या निवेदनाद्वारे श्री.विपूल राठोड, सहायक वनसंरक्षक यांचेवर कार्यवाही करुन त्यांना निलंबीत करण्याची विनंती केली आहे.

(४) व (५) स्थानिक लोक प्रतिनिधींनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करुन अहवाल शासनास सादर करण्याचे निर्देश अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना दिले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खारेपाटण (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) गावातील सुखनदी पात्रातील गाळ काढण्याबाबत

**(५६) * ११६६७८ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००९-२०१० मध्ये जिल्हाधिकाऱ्याच्या आदेशान्वये शासनाच्या सिंधुदुर्ग जिल्हा जलसंपदा यांत्रिक विभागाकडून सुखनदी पात्रातील गाळ काढण्याचे काम पूर्ण करण्यात आले असल्याने मागील काही वर्ष खारेपाटण (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) बाजारपेठेसह गावाला पुराच्या पाण्यापासून धोका टळला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेली दोन वर्ष पावसाळ्यात समुद्राला असलेली भरती आणि जोरदार पावसामुळे सुखनदी पात्रात पुन्हा मोठ्या प्रमाणात गाळ साचल्यामुळे खारेपाटण गावाला पुराचा धोका निर्माण झाला असल्याने सुखनदी पत्रातील गाळ उपसा करून त्याचा योग्य प्रकारे निपटारा करण्यात यावा अशी मागणी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग, कार्यकारी अभियंता, सिंधुदुर्ग, जलसंपदा विभाग आदींकडे मागील १ वर्षापासून लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, १० वर्षापूर्वी सुखनदीतील उपसा केलेला गाळ हा आखवणे भोम धरण प्रकल्पासाठी वापरण्यात आला असल्याने त्यातून शासनाला मोठ्या प्रमाणात रॉयल्टी मिळाली होती, आता महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम मोठ्या प्रमाणावर सुरु असल्याने त्यासाठी सुखनदी पात्रातील उपसलेल्या गाळाचा वापर केल्यास नदीचे पात्रही मोकळे होईल आणि शासनाला रॉयल्टी मिळू शकेल, हे ही खरी आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीनुसार सुखनदी पात्रातील साचलेला गाळ उपसा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) याबाबत कोकण प्रदेशांतर्गत क्षेत्रीय कार्यालयांकडे मागील वर्षभरात लेखी निवेदन प्राप्त झालेले नाही.

(३) व (४) महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी गाळाचा वापर करण्याची बाब सार्वजनिक बांधकाम विभाग व महसूल विभागाशी संबंधित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## "नदी-खोरे अभिकरण" स्वायत्त संस्था स्थापन करण्याबाबत

**(५७) * ११७०७९ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सिंचन प्रकल्पातील हजारो कोटी रुपयांचे गैरव्यवहार टाळण्या बरोबरच समन्यायी पद्धतीने पाणीवाटप करण्यासाठी नेमलेल्या तज्ञ समितीने शासनाला त्यांचा अहवाल सादर केल्याचे माहे एप्रिल २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात पाचही पाटबंधारे महामंडळे बंद करुन '"नदी-खोरे अभिकरण" ही स्वायत्त संस्था स्थापन करुन सिंचन प्रकल्पाची उभारणी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या अधिकारात करण्याची शिफारस समितीने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शिफारशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.
(२) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम,२००५ मधील कलम १५ नुसार नदी खोरे अभिकरणामार्फत खोरेनिहाय व उपखोरेनिहाय जल आराखडे तयार करावयाचे आहेत.तसेच सदर अधिनियमातील कलम २(१)(प)नुसार नदी-खोरे अभिकरण म्हणजे विविध नदी खो-यांसाठी कार्यरत असलेली नदी खोरे/सिंचन विकास महामंडळे आहेत. सद्य:स्थितीत राज्यातील पाच पाटबंधारे विकास महामंडळांचे रुपांतरण विधीवत स्वरुपात नदीखोरे अभिकरण म्हणून झालेले नाही. तथापि,मजनिप्रा अधिनियम,२००५ मधील

वरील तरतूदींचा विचार करता नदी खोरे अभिकरणे कार्यरत आहेत. डॉ.माधवराव चितळे समितीने राज्यातील पाटबंधारे महामंडळांचे नदीखोरे अभिकरणात रुपांतरण करण्याची शिफारस केली होती.

(३) डॉ.माधवराव चितळे समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने एकंदरीत महामंडळांच्या कामकाजाचा सखोल अभ्यास करुन याबाबत करावयाच्या उपाययोजनांच्या शिफारशींसह परिपूर्ण अहवाल तयार करण्याकरिता उपलब्धता व उपयुक्तता यांचा विचार करुन महामंडळांचे नदी खोरे अभिकरणात रुपांतर करण्याच्या दृष्टीने श्री.सुरेश कुमार (सेवानिवृत्त भा.प्र.से. व माजी उपलोकआयुक्त) यांची नियुक्ती करण्याबाबतचा दि.२८.०४.२०१५ रोजीच्या शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.८२/आ.(वर्ग-१) अन्वये अभ्यासगट स्थापन करण्यात आला आहे. सदर अभ्यासगटाकडून दि. ३० जानेवारी, २०१६ रोजी शासनास अहवाल सादर करण्यात आला आहे. सदर अहवालाचे सादरीकरण प्रधान सचिव (जसं) यांच्याकडे दि. ७ एप्रिल, २०१७ व १६ ऑक्टोंबर, २०१७ रोजीचे बैठकीत करण्यात आले.

सदर अभ्यासगटाकडून प्राप्त झालेल्या अहवालातील सिंचन विकास महामंडळाच्या पुनर्रचनेबाबत शिफारशीं थोडक्यात खालीलप्रमाणे आहेत.

"सिंचन विकास महामंडळांना (IDC) प्राधान्याने मूलत: पुनर्रचित केले जाऊ शकते आणि जलक्षेत्राच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सर्वांगीण दृष्टीकोनातून समर्थित आणि सशक्त केले जाऊ शकते. अधिनियम, नियम, विनियम आणि कार्यकारी सूचनांचे नियामक आराखडे एकत्रित केले जाऊ शकतात. एसआयसी, कॅग, इतर अहवालांच्या अहवालात सिंचन विकास महामंडळाच्या (IDC) कामकाजातील अकार्यक्षमता, कमीपणा आणि अनियमितता सुनिश्चित करण्यासाठी तरतूद करावी आणि अशी पुनरावृत्ती होणार नाही व नदी खोरे अभिकरणाने (RBA) दिलेली उद्दिष्टे साध्य केली जातील. पुढील २०-२५ वर्षे निर्मिती असेल असा प्रस्ताव एक लहान गटाकडून सखोल आणि जागरूक निर्णय घेवून प्रत्येक पैलूवर चर्चा करून तयार केला जाऊ शकतो."

या बाबत पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंगणवाडीतील बालकांच्या आरोग्य तपासणीत होणारे दुर्लक्ष

**(५८) * ११६८४९ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ९७ हजार अंगणवाड्या मधील ७२ लाख बालकांच्या आरोग्याची तपासणी 'राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम' अंतर्गत माहे ऑक्टोबर, २०१७ ते मार्च, २०१८ अखेरपर्यंत करण्याचे उद्दिष्ट आरोग्य विभागाने निश्चित केले असताना माहे मार्च, २०१८ अखेर केवळ २६ लाख २६ हजार बालकांच्या आरोग्याची तपासणी करण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे व पालघर जिल्ह्यात गेल्या दोन वर्षात मोठ्या प्रमाणात बालमृत्यू होऊनही आरोग्य विभागाने या भागातील ६७०० अंगणवाड्यांपैकी ४९ टक्केच अंगणवाड्यांची तपासणी केली असून, अंगणवाड्यांमधील ५२ लाख मुलांपैकी ४३ टक्केच बालकांच्या आरोग्याची तपासणी माहे डिसेंबर, २०१७ अखेर पर्यंत झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बालकाच्या आरोग्याची तपासणी करण्याचे काम हे आरोग्य विभागाचे असून राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत या बालकांना होणारे आजार, जन्मतः असलेले व्यंग, जीवनसत्वाच्या अभावामुळे होणारे आजार व अपंगत्व आदीचे निदान वेळेवर करुन उपचार करणे अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार अंगणवाडीतील बालकांच्या आरोग्याची तपासणी तात्काळ पूर्ण करण्याबाबत व बालकांच्या आरोग्याची तपासणी करण्यास दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

राज्यामध्ये माहे ऑक्टोंबर २०१७ ते मार्च २०१८ या कालावधीत एकूण १,०३,२९९ अंगणवाड्यांपैकी १,०१,७९९ इतक्या अंगणवाड्या तपासण्यात आल्या असून त्याची टक्केवारी ९९ इतकी आहे. तसेच त्यातील एकूण ७३,४०,१८७ मुलांपैकी ६६,४०,८०० इतक्या मुलांची तपासणी करण्यात आली असून त्याची टक्केवारी ९०.४७ इतकी आहे.

(२) हे खरे नाही.

ठाणे व पालघर जिल्ह्यांमधील अंगणवाड्याची माहे ऑक्टोंबर २०१७ ते मार्च २०१८ या कालावधीतील माहिती खालीलप्रमाणे -

| जिल्हा | अंगणवाडी संख्या | तपासलेल्या अंगणवाड्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| ठाणे | ३,५८६ | ३,५४६ | ९९ |
| पालघर | ३,१७२ | ३,१७२ | १०० |
| एकूण | ६,७५८ | ६,७१८ | ९९.४० |
| जिल्हा | एकूण अंगणवाड्यांची संख्या | एकूण तपासलेल्या अंगणवाड्यांची संख्या | टक्केवारी |
| ठाणे | ३,०२,९३१ | २,८१,४५२ | ९३ |
| पालघर | २,२८,१५९ | २,१६,५२८ | ९२ |
| एकूण | ५,३१,०९० | ४,९७,९८० | ९२.७६ |

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## खेड (जि.रत्नागिरी) तालुका वनविभाग कार्यालयातून लाकूड वाहतूकप्रकरणी देण्यात येणाऱ्या परवान्यांमध्ये झालेली अनियमितता

**(५९) * ११७३१८ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वनविभागाच्या दापोली (जि.रत्नागिरी) परीक्षेत्र कार्यालयाच्या अखत्यारित येत असलेल्या खेड तालुका वनविभाग कार्यालयातून लाकूड वाहतूकप्रकरणी देण्यात येणाऱ्या परवान्यांमध्ये अनियमितता झाल्याची बाब माहे मे २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी एका वनपालावर तात्पुरत्या निलंबनाची कारवाई करण्यात आली असून या प्रकरणाची संपूर्ण चौकशी परिक्षेत्र वनअधिकारी यांचेमार्फत करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी वनपाल खेड यांना दिनांक ५.५.२०१८ रोजी मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर यांनी निलंबित केले आहे. प्रकरणी त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देऊळगाव कुंडपाळ (ता.लोणार, जि.बुलढाणा) येथील ग्रामपंचायतीच्या ताब्यातील गायरान जमिनीवर झालेली अवैध वृक्षतोड

**(६०) * ११९१४३ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील लोणार तालुक्यातील देऊळगाव कुंडपाळ येथील ग्रामपंचायतीच्या ताब्यातील ११० एकरावरील गायरान जमिनीवर अवैध वृक्षतोड सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

तलाठी यांनी तहसिलदार यांना दिनांक ९.५.२०१८ रोजी दिलेल्या प्रतिवेदनानुसार गैरअर्जदार श्री. उध्दव त्र्यंबक वाघ रा. अजिसपूर, ता.लोणार यांनी विना परवाना गायरान जमिनीवर अवैध वृक्षतोड केल्याचे दिसून आले आहे.

(२) सदर प्रकरणी ग्रामपंचायत सचिव, तलाठी व स्थानिक ७ ग्रामस्थांच्या उपस्थितीत दि. २९.०४.२०१८ रोजी स्थळ निरिक्षण व पंचनामा करण्यात आला. त्यानुसार देऊळगांव कुंडपाळ ग्रामपंचायतीच्या गट नं. ३९० व ३९१ “ई” क्लास हद्दीतील ५ झाडे श्री.उध्दव त्र्यंबक वाघ रा.अजिसपूर यांनी विना परवानगी तोडल्याचे आढळून आले आहे.

(३) तहसिलदार, लोणार यांनी दोषी व्यक्तीकडून रु. ५,०००/- इतकी दंडाची रक्कम वसूल करुन ती दिनांक ९ मे, २०१८ रोजी चलनाद्वारे भरणा केलेली आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्हा रुग्णालयातील गैरकारभार व गैरसोयीबाबत

**(६१) * ११६७२७ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर),**

**श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा रुग्णालयातील गैरकारभाराची चौकशी करुन उपाययोजना करणे व इतर मागण्यांवर निर्णय घेण्याच्या मागणीसाठी सामाजिक संघटना व डॉक्टरांनी दिनांक ७ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय ते सिव्हील रुग्णालया दरम्यान मोर्चा काढून आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर रुग्णालयातील शस्त्रक्रियागर (ऑपरेशन थियेटर) बंद असून, प्रसूतिगृहात स्लॅब कोसळणे व विद्‌युत दाहिनीला लागलेली आग अशा अनेक घटना घडत असल्यामुळे याचा रुग्णांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आंदोलकांनी केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे, त्यानुसार शासनाने चौकशी केली आहे काय व त्याचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधितांवर कारवाई करण्याबाबत व जिल्हा रुग्णालयाचा पुनर्विकास करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

दि.७ एप्रिल, २०१८ रोजी मोर्चा काढण्यात आला होता. तथापि सदरचा मोर्चा ठाणे जिल्हा रुग्णालयातील गैरकारभाराची चौकशी करुन उपाययोजना करणे यासाठी नसून शासकीय रुग्णालयाच्या खाजगीकरणांच्या विरोधात व ठाणे जिल्हयातील शासकीय आरोग्य यंत्रणेत सुधारणेबाबतचा होता.

(२) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा रुग्णालयातील प्रसूतिगृहातील स्लॅब अल्प प्रमाणात पडलेला होता. तसेच दि.१०.०२.२०१८ रोजी जिल्हा रुग्णालय ठाणे येथील मुख्य शस्त्रक्रियागृहातील इलेक्ट्रीक डी.बी. मध्ये विद्युत शॉर्ट सर्किट झाल्यामुळे डी.बी मधील कॉईल्स्, वायर जळाल्यामुळे शस्त्रक्रियागृहात धूर पसरला होता. सदरची दुरुस्ती करण्यात आली असून शस्त्रक्रियागृहात नियमित शस्त्रक्रिया करण्यात येत आहेत.

(३), (४) व (५) आंदोलकांच्या मागण्या १) शहापूर, मुरबाड, वाडा व इतर ठिकाणावरील रुग्ण उपचारासाठी ठाणेकडे स्थलांतरीत केली जातात. त्यांना त्याच रुग्णालयामध्ये उपचार मिळावा, २) वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी उपलब्ध करुन देण्याबाबत, ३) अपंग रुग्णाकरीता ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालय येथे अस्थिरोग तज्ञ आठवडयातून एक दिवस पाठविण्यास व्यवस्था करावी व इतर विविध मागण्या करण्यात आल्या असून आंदोलकांच्या मागण्यांची तपासणी करुन त्याबाबतचा निर्णय घेण्याची कार्यवाही जिल्हा शल्य चिकित्सक स्तरावर सुरु आहे.

-----------------

## राज्यातील जिल्हा रुग्णालयात केमोथेरपीची मोफत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(६२) * ११७१८० अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे**

**ग्रामीण), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.संजय कदम (दापोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्करोगावरील उपचारामध्ये महत्वाची भूमिका असणाऱ्या केमोथेरपीची मोफत सुविधा राज्यातील जिल्हा रुग्णालयात उपलब्ध करुन देण्याचा निर्णय राज्य शासनाने माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार आतापर्यंत कोणत्या जिल्हा रुग्णालयांना केमोथेरपी युनिट सुरु करण्याची परवानगी देण्यात आली आहे,

(३) असल्यास, राज्यातील उर्वरित जिल्हा रुग्णालयांना केमोथेरपी युनिट सुरु करण्याची परवानगी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) गडचिरोली, अमरावती, पुणे, जळगाव, रत्नागिरी, नाशिक, भंडारा, सातारा, वर्धा, अकोला, नागपूर या राज्यातील ११ जिल्हयातील जिल्हा रुग्णालयात टाटा मेमोरिअल हॉस्पीटलच्या सहकार्याने केमोथरेपी यूनिट चालू करण्याचे ठरविले असून याबाबतची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

(३) राज्यातील उर्वरित जिल्हयामध्ये सुध्दा टप्प्या-टप्प्याने केमोथेरपी युनिट कार्यान्वित करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कापूरवाडी (ता.नगर, जि.अहमदनगर) येथील वन विभागाच्या हद्दीत बेकायदा गौण खनिजाचे उत्खन्न व वृक्षतोड होत असल्याबाबत

**(६३) * ११७६७१ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कापूरवाडी (ता.नगर, जि.अहमदनगर) येथील वन विभागाच्या हद्दीत बेकायदा गौण खनिजाचे उत्खन्न व हजारो वृक्षाची अवैधरित्या तोड केल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच कापूरवाडी येथे रात्रीच्या सुमारास बेकायदा हजारो ब्रॉस मुरुम उपसल्याचेही निदर्शनास आलेआहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक नागरिकांनी वन विभागाकडे तक्रारी करुनही वन विभागाने कोणतीही कार्यवाही न करता त्याकडे दुर्लक्ष केले आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, त्यानुसार वन विभागाचया हद्दीत बेकायदेशीरपणे गौण खनिजाचे उत्खन्न करणाऱ्या व वृक्षाची अवैधरित्या तोड करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) मौजे कापुरवाडी येथे वन विभागाच्या हद्दीत वृक्ष तोड झाल्याची बाब आढळून आलेली नाही. तथापि, दिनांक १४.४.२०१८ रोजी रात्री अज्ञात इसमांनी २५ ते ३० ब्रास मुरुमाचे उत्खनन केल्याचे आढळून आले आहे.

(३), (४), (५) व (६) याप्रकरणी अज्ञात इसमांविरुद्ध दिनांक २४.४.२०१८ रोजी वनगुन्हा नोंदविण्यात आलेला असून त्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

प्रश्नांकित क्षेत्रावर वृक्ष तोड व अवैध उत्खनास प्रतिबंध करण्यासाठी वनकर्मचाऱ्यांच्या खास बाब म्हणून नेमणुका करुन रात्रीच्या वेळी गस्त घालण्यात येत आहे.

-----------------

## धुळे जिल्हयात इंदिरा आवास योजनेंतर्गत अपूर्णावस्थेत असलेल्या घरकुलांचे बांधकाम करण्याबाबत

**(६४) * ११८३१६ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयात इंदिरा आवास योजनेंतर्गत सन २०१० ते २०१६ या कालावधीत जिल्हयात ३२ हजार ६६७ घरकुलांना मंजूरी देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मंजूरीनंतर मोठा अवघी उलटला तरी अद्यापपर्यंत १ हजार ४१२ घरकुलांची कामे अपूर्ण राहिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार अपूर्ण घरकुले तात्काळ पूर्ण करण्यासह या घरकुलांच्या बांधकामास विलंब लावणाऱ्या संबंधित अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे

(२) हे खरे आहे

(३) अपुर्ण घरकुले जलदगतीने पुर्ण करण्यासाठी संबधीत ग्रामसेवक, सरपंच यांना सूचना देण्यात आल्या असून लाभार्थ्यांचे मेळावे आयोजित करुन त्यांना मार्गदर्शन करणे तसेच संबंधित सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या बैठका आयोजित करुन अपुर्ण घरकुले तातडीने पुर्ण करण्याबाबत निदेश देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## दौंड (जि.पुणे) तालुक्यातील मुळा मुठा व भीमा नदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधा-यांना लागलेल्या गळतीबाबत

**(६५) * १२३९८१ श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील मुळा मुठा व भीमा नदीवरील १३ कोल्हापूर पद्धतीच्या बंधा-यांना लागलेल्या गळतीमुळे मोठ्या प्रमाणावर पाणी गळती होत असल्याची बाब दिनांक ०३ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बंधा-याची दुरुस्ती करुन नवीन ढापे बसविण्याची मागणी लोकप्रतीनिधिंनी तसेच स्थानिक नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार उक्त १३ बंधाऱ्यांची दुरुस्ती करुन नवीन ढापे बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

सदर कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यातून काही प्रमाणात गळती आहे.

(२) हे खरे आहे.

(३) दौंड तालुक्यातील एकूण १३ कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांसाठी सन २०१७-१८ मध्ये एकूण ३१२७ नवीन लोखंडी बर्गे बसविले असून सन २०१८-१९ मध्ये ३०७९ नवीन बर्गे तयार करून बसविण्याचे नियोजन आहे.

तसेच राहू व देऊळगाव राजे ता.दौंड या दोन को.प. बंधाऱ्याची विशेष दुरूस्ती बिगर सिंचन पाणीपट्टीच्या ४०% उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वालधुनी (जि.ठाणे) नदीच्या पात्रात झालेले अतिक्रमण

**(६६) * ११८१२७ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.जयकुमार गोरे (माण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वालधुनी (जि.ठाणे) नदीच्या पात्रात कॉंक्रीटची भिंत उभारली असून, पात्राच्या दोन्ही बाजूला मोठे खांब उभारून मध्ये लोखंडी जाळी टाकून नदीपात्र अडविले असल्याचे माहे मे महिन्यामध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अनधिकृत बांधकामामुळे नदीच्या पूर रेषेचे उल्लंघन झाले असून नदीपात्रातील अतिक्रमणामुळे स्थानिक आदिवासींच्या जमिनीवर आणि काकोळे तलावाच्या पाणीसाठ्यावर गंभीर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे
आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात मुख्यमंत्री कार्यालयात तक्रार करूनदेखील अतिक्रमणाबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार नदी पात्रातील अतिक्रमण निष्कासित करून अतिक्रमण करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे आहे.

अतिरिक्त अंबरनाथ औद्योगिक क्षेत्रामधील जी-२, हा १९६७९९.०० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड मे. सिएट स्पेशालिटी टायर्स प्रा.लि यांना वाटप करण्यात आला असून, भूखंडाचा ताबा दि. ०१/०९/२०१० रोजी देण्यात आलेला आहे. या भुखंडावरील नियोजित इमारतीचे नकाशे, कार्यकारी अभियंता अंबरनाथ (स्थापत्य) विभाग यांचे पत्र दिनांक २०/१०/२०१६ अन्वये एकुण ५८६५०.८३ चौ.मी इतक्या बांधकाम क्षेत्राफाळासाठी मंजूर करण्यात आलेले आहेत.

या भुखंड क्र. जी-२ मधून एक नैसर्गिक प्रवाह ऋतुनुसार वाहत असतो. या नैसर्गिक प्रवाह सुरळीतपणे वाहन्याकरीता प्रवाहाच्या दोन्ही बाजूंचे मजबुतीकरण करण्याकरीता आधारभिंतींच्या बांधकामासाठी भूखंडधारकाने केलेल्या मागणीनुसार विभागीय कार्यालयाचे दिनांक १०/०६/२०१७ अन्वये मंजूरी दिलेली आहे. तसेच दिनांक १०/०५/२०१८ रोजी केलेल्या प्रत्यक्ष पाहणीदरम्यान एका बाजूच्या भिंतीचे बांधकाम सुरु असल्याचे आढळून आले.

मे. सिएट स्पेशालिटी टायर्स लि. यांचे कडून भूखंडातून वाहणारा नैसर्गिक जलप्रवाह ज्याठिकाणी भूखंडाची संरक्षक भिंत पार करतो त्याठिकाणी भूखंडाच्या सुरक्षिततेसाठी संरक्षक भिंतीस जलप्रवाहासाठी आरसीसी कॉलम उभेकरुन मध्ये लोखंडी जाळी बसविण्यात आली होती. सदर लोखंडी जाळी त्वरित काढून टाकण्यात यावी, असे मे. सिएट स्पेशालिटी टायर्स. लि. यांना उप अभियंता, अतिरिक्त अंबरनाथ उप विभाग यांचे पत्र दिनांक ०१/०६/२०१८ अन्वये कळविण्यात आले होते व त्यानुसार भुखंडधारकाने लोखंडी जाळी त्वरीत काढून टाकली आहे.

(२) हे खरे नाही.

भूखंडामधून वाहत असलेल्या नैसर्गिक जलप्रवाहाच्या दोन्ही बाजूस आधार भिंतीच्या बांधकामास महामंडळाचया विकास नियंत्रण नियमावलीच्या अधिन राहून मंजूरी देण्यात आलेली आहे. आधार भिंत बांधकामास परवानगी देण्यापूर्वी, सदर जलप्रवाहातून होणाऱ्या पाण्याचा विसर्ग व त्याची आकडेवारी कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, कळवा यांचे कार्यालयीन पत्र दि.०२/०६/२०१७ अन्वये प्राप्त झाली असून त्यानुसार आवश्यक असलेली १६.०० मीटर रुंदी प्रवाहाच्या दोन्ही बाजूस बांधण्यात येणाऱ्या आधारभिंतीमध्ये जलप्रवाहासाठी ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. सदर बांधकामामुळे भूखंडातून वाहणाऱ्या नैसर्गिक जलप्रवाहामध्ये कोणत्याही प्रकारच्या अडथळा निर्माण होत नसल्याने स्थानिक आदिवासीच्या जमिनीवर व काकोळे तलावाच्या पाणीसाठ्यावर परिणाम होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खामगाव (जि.बुलढाणा) येथील प्रादेशिक वन विभागाच्या शासकीय लाकूड आगारास आग लागल्याबाबत

**(६७) * ११९२६२ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा व खामगाव प्रादेशिक वन विभागाच्या शासकीय लाकूड आगारास आग लागून सागवन लाकडासह लाखो रुपयांची वन संपदा एकाच दिवशी जळून खाक झाल्याची बाब दिनांक २८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आगीच्या नुकसानाची व्याप्ती मोठया प्रमाणात असून एकाच दिवशी ठराविक अंतरावर आग लागल्यामुळे सदर प्रकारमागे घात-पात असल्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(४)असल्यास, त्यानुषंगाने या प्रकरणातील संबंधीत दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) बुलढाणा व खामगाव हे दोन्ही वेगवेगळे प्रादेशिक वनविभाग नसून बुलढाणा जिल्हयातंर्गत बुलढाणा प्रादेशिक वन विभाग, बुलढाणा हा एकच प्रादेशिक वनविभाग आहे. सदरची घटना ही बुलढाणा प्रादेशिक विभागातंर्गत येणाऱ्या खामगाव परिक्षेत्रातील आहे. दिनांक २५.४.२०१८ रोजी खामगाव जि.बुलढाणा येथील प्रादेशिक वन विभागाच्या शासकीय लाकूड आगारास आग लागली. सदर आगीमध्ये आडजात १५४ नग, घ.मी.६२.२६३ व जळतन ३८.३५० घ.मी. एवढा माल जळून नष्ट झाला आहे. सदर आगीमध्ये अंदाजे रु.७८३४२/- चे नुकसान झाले आहे.

(३) व (४) ग्रामीण पोलीस स्टेशन, खामगाव यांना घटनेबाबत माहिती देऊन तपास करण्याबाबत कळविले त्यानुसार पोलीसांनी घटनेचा पंचनामा केला आहे. आगारास लागलेल्या आगीबाबत १ वनरक्षक व १ वनमजूर यांना निलंबीत करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लोणेरे (ता.माणगांव, जि.रायगड) येथील पन्हळघर धरण अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(६८) * १२०२३५ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणेरे (ता.माणगांव, जि.रायगड) परिसरात कोटयावधी रूपये खर्च करूनसुध्दा पन्हळघर धरण अद्यापही अपूर्णावस्थेत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणाचे काम पूर्ण होऊन बराच कालावधी उलटूनसुध्दा कालव्याला पुरेसा निधी न मिळाल्यामुळे डावा व उजवा अशा दोन्ही कालव्यांची कामे अद्यापही अपूर्णावस्थेत असल्यामुळे शेतक-यांची व बागायतदारांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून धरणातले साठवलेले पाणी शेतक-यांना व बागायतदारांना मिळण्यासाठी दोन्ही कालव्यांचे काम तात्काळ करण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

पन्हळघर धरणाचे काम जून, २००८ मध्ये पूर्ण झाले आहे.

(२) प्रकल्पाच्या कालव्यांची कामे ३० टक्के पूर्ण झाली आहेत आणि योजनेवर प्रत्यक्षात ३० हेक्टर सिंचन दरवर्षी होत आहे. कालव्याची उर्वरित कामे भूसंपादन प्रक्रिया, नवीन भूसंपादन कायदा-२०१३ नुसार करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार दोन्ही कालव्यांची कामे करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील शिरवळ - भेकुर्ली या रस्त्याच्या प्रलंबित कामाबाबत

**(६९) * ११६६७९ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत शिरवल-भेकुर्ली या रस्त्याचे मागील ३ वर्षापासून सुरु असलेले काम अद्याप अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिरवल ते निडलवाडी या रस्त्यांपैकी शिरवल ते निडल धनगरवाडी प्राथमिक शाळेजवळ ३ किलोमीटर खडीकरण, डांबरीकरण व संरक्षक कठडे इत्यादी कामे गेली २ वर्ष अपुर्ण असल्याने पावसाळ्यात दरड कोसळून रस्ता संपूर्णत: बंद होत असल्याने रस्ते विकासमंडळ कुडाळ यांना सदरहू काम तातडीने सुरु करून धनगरवाडी ग्रामस्थांची गैरसोय दूर करावी यासाठी त्या परिसरातील ग्रामस्थांची कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग सावंतवाडी, जिल्हधिकारी सिंधुदुर्ग आदींकडे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,सदरहू रस्त्याच्या कामास झालेल्या गैरव्यवहाराबाबत त्या परिसरामधील ग्रामस्थांनी दिनांक २६ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास उपोषणही केले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर अपूर्ण कामे तात्काळ पूर्ण करण्यासह अपूर्ण कामे ठेवणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतंर्गत दोडामार्ग तालुक्यातील शिरवल ते निडल धनगरवाडी या भागावर वनसंज्ञा असून वनखात्याने डांबरीकरण करण्यास परवानगी दिली नसल्याने या ठिकाणी फक्त खडीकरणापर्यंतच काम पुर्ण केलेले आहे.

किमी ३/८०० ते ४/२०० या ठिकाणी मोठा डोंगर असून माती ठिसूळ असल्याने पावसाळयात या ठिकाणी माहे जून, २०१६ च्या सुमारास दरड कोसळून रस्ता बंद पडला होता. तथापि, सदर दरड हटवून रस्ता वाहतुकीसाठी लगेचच पूर्ववत केला होता.

याबाबत दि.०९.०८.२०१७ रोजी ग्रामस्थांनी कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, जि.सिंधुदूर्ग, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी आणि जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांच्याकडे निवेदन दिलेले होते.

(३) व (४) सदरहू रस्त्याच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराबाबत त्या परिसरामधील ग्रामस्थांनी उपोषण केले हे खरे नसून, भेकुर्ली गावामध्ये एस टी वाहतूक सुरु होत नाही म्हणून दि.२६ जानेवारी, २०१८ रोजी तहसिलदार, दोडामार्ग यांच्या कार्यालयासमोर ग्रामस्थ उपोषणास बसले होते.

सद्य:स्थितीत एस टी वाहतूक सुरु करण्यासाठी संबंधित मक्तेदाराकडून आवश्यक दुरुस्ती करुन घेण्यात येऊन एस टी वाहतूक सुरु करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वेरळ-भोस्ते-कोंडीवली-शिव-बोरज (ता.खेड, जि.रत्नागिरी) रस्त्याचे काम अपूर्ण व निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(७०) * ११७३४४ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेरळ-भोस्ते-कोंडीवली-शिव-बोरज (ता.खेड,जि.रत्नागिरी) या मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील रस्त्याचे काम दिनांक ८ मार्च, २०१७ रोजी सुरु झाले असून या कामाची मुदत माहे मार्च, २०१८ पर्यंत होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाची मुदत संपल्यानंतरही काम अपूर्णावस्थेत असून आतापर्यंत झालेले कामदेखील निकृष्ट दर्जाचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार रस्त्याचे काम अपूर्ण व निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) सदर कामाची मुदत संपल्यानंतर नुकसान भरपाईबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात आली असून ठेकेदारामार्फत उर्वरीत काम करण्याची कार्यवाही सुरू आहे. सदर कामाची SQM व SSQM यांनी पाहणी केली असून त्यांनी काम समाधानकारक असल्याचा शेरा दिला आहे.
सदर कामाच्या चेनेज १३/५०० ते १४/९५० मधील ग्रामस्थांनी रस्ता रुंदीकरणासाठी विरोध केल्याने मक्तेदाराला विहीत मुदतीत काम पुर्ण करता आले नाही.

-----------------

## ठाणे येथील येऊरच्या डोंगरावरुन भेंडी नाल्यावाटे वाहून जाणाऱ्या पाण्याचा संचय करण्यासाठी धरण बांधण्याबाबत

**(७१) * ११६८७८ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील येऊरच्या डोंगरावरुन भेंडी नाल्यावाटे लाखो लिटर पाणी चेना खाडीत वाहून जात असल्याने येऊरहून येणा-या पाण्याचा संचय करण्यासाठी येथे धरण बांधण्याचा घेतलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्याची मागणी लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्थांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार येऊरच्या डोंगरावरुन वाहून जाणारे पाणी साठविण्यासाठी धरण बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांचे पत्र क्र.सामान्य/क-४/टे-२/स्व.सा.सं./२०१८ दि.२३/०४/२०१८ अन्वये नियमोचीत कार्यवाही करण्यासाठी मा.आयुक्त,ठाणे महानगर पालिका कार्यालयाकडे पाठविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## वसई व वाडा (जि.पालघर) तालुक्यांना जोडणाऱ्या भालिवली-निंबवली रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत

**(७२) * ११७२७७ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई व वाडा (जि.पालघर) तालुक्यांना जोडणाऱ्या भालिवली-निंबवली या रस्त्याचे काम संबंधित ठेकेदारांनी पूर्ण न केल्यामुळे अद्यापी अपूर्ण स्थितीत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार उक्त रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत तसेच काम पूर्ण करण्यास विलंब लावणाऱ्या संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर कामास दि.३१.०३.२०१८ पर्यंत मुदतवाढ मंजूर करण्यात आली होती. तथापि, दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न केल्यामुळे दि.०१.०४.२०१८ पासून कंत्राटदारास रु.३०००/-प्रतिदिन नुकसान भरपाई म्हणून दंड आकारण्यात आला आहे. सदर काम दि.३०.०६.२०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील कुंभारमाठ येथून घुमडे वस्तवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यालगत झालेले अनधिकृत बांधकाम

**(७३) * १२२१४६ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील कुंभारमाठ येथून घुमडे वस्तवाडी कडे जाणाऱ्या रस्त्यालगत मोठ्या प्रमाणावर झालेल्या अनधिकृत बांधकामासंबधी तक्रारी श्री अशोक सावंत व अन्य ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मालवण, जिल्हापरिषद बांधकाम अधिकारी, तहसीलदार, मालवण आदींकडे मागील ६ महिन्यांपासून सातत्याने केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदरहू रस्त्याच्या दोन्ही बाजूने मध्य भागापासून १२ मीटर बाहेर बांधकामे असणे आवश्यक असताना अनेकांनी सदरहू नियमाचे उल्लंघन करून मोठ्या प्रमाणात बांधकामे केले असून सदरहू बांधकामे निष्कासित करण्याची मागणी होत असतानाही अद्यापपर्यंत सदरहू अतिक्रमणे काढण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदरहू अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यासह अनधिकृत बांधकाम करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

श्री.राजाराम अशोक वस्त व इतर ६० जणांनी गट विकास अधिकारी पंचायत समिती, मालवण यांच्या कार्यालयाकडे दिनांक ०५.०६.२०१८ रोजी अनाधिकृत बांधकामावर तातडीने कार्यवाही करण्याबाबत अर्ज दिलेला आहे.
(२) व (३) हे खरे आहे.

कुंभारमाठ येथून घुमडे वस्तवाडी कडे जाणा-या रस्त्यावर ६ घरे व १९ कंपांऊड्सची अतिक्रमणे आहेत. अतिक्रमण धारक श्री विनय भिकाजी गावकर यांनी मालवण येथील मा. दिवाणी न्यायाधिश यांच्या न्यायालयात दाखल केलेल्या दिवाणी वाद क्रमांक ४९/२०१८ च्या संदर्भात दिनांक २२.०६.२०१८ रोजी झालेल्या सुनावणी वेळी जैसे थे परिस्थिती कायम राखावी असा आदेश पारीत झालेला आहे. या पार्श्वभुमीवर अद्याप पर्यंत सदरहु अतिक्रमण काढण्यात आलेली नाहीत. उर्वरित अतिक्रमणधारकांबाबत महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ५३ नुसार जिल्हा परिषद रस्त्यावर केलेले अतिक्रमण काढून टाकण्याबाबत संबधीतांना ग्रामपंचायतीमार्फत नोटिसा देण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**नागपूर.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर

मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.